| लातूर | वर्ष ३५ वे | अंक २ रा | गुरूवार, दिनांक १२ मार्च २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)    कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# गॅस बॉटलिंग प्लँट, वितरण व्यवस्थेची सुरक्षा वाढवा!

## केंद्राचे राज्यांना महत्त्वाचे निर्देश

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था : पश्चिम आशियातील संघर्षामुळे एलपीजी सिलेंडरच्या पुरवठ्यावर निर्बंध येऊ शकतात अशी भीती लोकांमध्ये व्यक्त होत आहे. देशातील एलपीजी गॅस पुरवठा साखळी सुरक्षित ठेवण्यासाठी आणि टंचाईच्या अफवांना लगाम घालण्यासाठी केंद्र सरकारने केंद्राने राज्यांना महत्त्वाचे निर्देश दिले आहेत.**

यासाठी केंद्रीय गृहसचिव गोविंद मोहन यांनी मंगळवारी सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालकांबोबर बैठक घेतली. घरगुती गॅसचा पुरवठा कोणत्याही अडथळ्यांशिवाय सुरू राहील याची काळजी घेणे आणि यासंबंधी पूर्वतयारीचा आढावा घेण्याच्या उद्देशाने ही बैठक घेण्यात आली.




जवळपास दोन तास चाललेल्या या बैठकीला इतर वरिष्ठ अधिकारी देखील उपस्थित होते. ज्यामध्ये पेट्रोलियम आणि नॅचरल गॅस, माहिती आणि प्रसारण तसेच ग्राहक व्यवहार मंत्रालयाचे सचिव यांचा समावेश होता. या बैठकीत देशभरातील एलपीजी उपलब्धतेचा आणि ८ मार्च रोजी जारी करण्यात आलेल्या एलपीजी कंट्रोल आदेशानुसार राबवण्यात येत असलेल्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला.

राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना एलपीजी इन्फ्रास्ट्रक्चर जसे की बॉटलिंग प्लँटस, वितरण व्यवस्था आणि वाहतुकीची वाहने यांच्यासारख्या एलपीजी पायाभूत सुविधांची सुरक्षा वाढवण्याचे, तसेच पुरवठा साखळीत सहभागी असलेल्या कर्मचाऱ्यांना सुरक्षा देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच दररोज स्थानिक एलपीजी पुरवठ्यावर देखरेख ठेवण्याच्या आणि नियम मोडल्यास किंवा ब्लॅक मार्केटिंगचा प्रयत्न झाल्यास कठोर कारवाई करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत, अशी माहिती सूत्रांनी दिली.

लोकांची चिंता दूर करणे आणि खोटी माहिती रोखण्यासाठी केंद्रीय गृह मंत्रालयाने राज्यांना जनजागृती मोहिम राबवण्याचे आवाहन केले आहे. ऑईल मार्केटिंग कंपन्यांच्या राबवलेल्या या मोहिमेमधून नागरिकांना घरगुती एलपीजी पुरवठ्याबाबत आश्वस्त करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर देखरेख ठेवणे आणि भीती पसरवू शकतील अशा फेक न्यूज किंवा बनावट व्हिडीओ काढून टाकणे यावरही भर देण्यात आला आहे, असे सूत्रांनी सांगितले.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बैठकीत रिफायनरी आणि पेट्रोकेमिकल कॉम्प्लेक्सेसना आधीच एलपीजीचे उत्पादन जास्तीत जास्त वाढवण्याचे आणि घरगुती वापरकर्त्यांच्या पुरवठ्याला प्राधान्य देण्याचे निर्देश देण्यात आल्याचे सांगण्यात आले. तसेच हॉटेल आणि रेस्टॉरंट्स यांसारख्या व्यावसायिक आस्थापनांच्या एलपीजी वितरणावर निर्बंध लादण्यात आले आहेत, मात्र हे निर्बंध रुग्णालये आणि शैक्षणिक संस्थांसह आवश्यक सेवांना लागू नाहीत.

# लातूरमध्ये विद्यार्थी आक्रोश मोर्चा; विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर परिषद आक्रमक

## विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचे तात्काळ निराकरण करावे; अन्यथा मुंबई मंत्रालयावर विद्यार्थी परिषदेकडून मोर्चा धडकणार : प्रदेश मंत्री डॉ. वरुणराज नन्नावरे






**लातूर/प्रतिनिधी :** विद्यार्थ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, लातूर यांच्या वतीने काढण्यात आलेला विद्यार्थी आक्रोश मोर्चा उत्साहात पार पडला. शेकडो विद्यार्थी कार्यकर्त्यांच्या सहभागामुळे शहरातील वातावरण घोषणांनी दणाणून गेले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, प्रशासकीय व सुरक्षेसंबंधी प्रश्नांवर प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

मोर्चादरम्यान आयटीआयमधील विद्यार्थ्यांना प्रॅक्टिकल विषयांसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधा अनेक ठिकाणी उपलब्ध नसल्याची गंभीर बाब मांडण्यात आली. प्रयोगशाळा व आवश्यक साधनसामग्रीच्या अभावामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत असल्याचे वक्त्यांनी नमूद केले. तसेच आयटीआय विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या भत्त्यात होणारी अनियमितता थांबवून तो वेळेवर मिळावा, अशी मागणी करण्यात आली.

जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची अनेक वर्षांपासूनची जिल्हा रुग्णालयासंदर्भातील मागणी अद्याप पूर्ण झालेली नसल्याबाबतही परिषदेकडून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. पुरेशा वैद्यकीय सुविधा नसल्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना विविध अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे सांगण्यात आले.

मोफत शिक्षणाच्या घोषणा केल्या जात असल्या तरी प्रत्यक्षात विद्यार्थ्यांकडून शिक्षण व ट्युशनची फी आकारली जात असल्याची टीकाही यावेळी करण्यात आली. तसेच एमपीएससी व यूपीएससीसारख्या स्पर्धा परीक्षांच्या वेळापत्रकात वारंवार होणारे बदल आणि त्यातून निर्माण होणाऱ्या अडचणींबाबतही विद्यार्थ्यांनी संताप व्यक्त केला. याशिवाय अनेक महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांची पदे रिक्त असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत असल्याचा मुद्दाही मोर्चात उपस्थित करण्यात आला. काही ठिकाणी विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी प्राध्यापकच उपलब्ध नसल्याची परिस्थिती असल्याचे सांगण्यात आले.

शहरातील शैक्षणिक परिसरात वाढत असलेल्या गुन्हेगारी व अमली पदार्थांच्या वाढत्या प्रमाणाबाबतही चिंता व्यक्त करत पोलिस प्रशासनाने कठोर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर प्रशासनाने तात्काळ ठोस निर्णय घ्यावेत, अन्यथा मुंबई मंत्रालयावर विद्यार्थी परिषदेकडून मोर्चा धडकविण्यात येईल, असा इशारा प्रदेश मंत्री डॉ. वरुणराज नन्नावरे यांनी दिला. या वेळी यश आरिकर, विशाल परिहार, ऋतुजा अट्टल, लक्ष्मी गोडबोले, गौरव पाटील, निकिता बिरादार आदी उपस्थित होते. मोर्चा प्रमुख म्हणून प्रतीक बारबोले यांनी काम पाहिले.

# 'जागेवरच निवड संधी' या मोहिमेअंतर्गत रोजगाराची संधी; लातूर येथे १३ मार्च रोजी प्लेसमेंट ड्राईव्ह

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व मॉडेल करिअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंडीत दीनदयाल उपाध्याय जागेवरच निवड संधी (प्लेसमेंट ड्राईव्ह) चे शुक्रवार, १३ मार्च, २०२६ रोजी सकाळी ११ वाजता लातूर जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र येथे आयोजित करण्यात आले आहे.

या रोजगार मेळाव्यात नामांकित आस्थापना, उद्योजक सहभागी होणार आहेत. या आस्थापनेमध्ये दहावी, बारावी, कोणतीही पदवी, पदव्युत्तर पदवी, आय.टी.आय., डिप्लोमा, तसेच इतर शैक्षणिक पात्रतेच्या उमेदवारांना सहभागी होता येणार आहे.

इच्छुक उमेदवारांनी शुक्रवार, १३ मार्च, २०२६ रोजी सकाळी ११ वाजता लातूर जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, शासकीय तंत्र प्रशाला केंद्र, जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालया समोर, लातूर येथे स्वखर्चाने मुलाखती करीता आवश्यक शैक्षणिक कागदपत्रे, स्वत:चा रिझ्युम, बायोडाटा, पासपोर्ट फोटो इ. (तीन प्रती) सह उपस्थित रहावे, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी, लातूर यांनी केले आहे.

## प्रभात किरणे

अशुद्ध वाणी, नाशके
पाणी स्वार्थ मनी,
सर्व कुचकामी गुण दुर्गुण
काय ज्याशी कळ नाथा
नागनाथ अनर्थ टळे
– इंजि. नागनाथ कलवले

# लातूरचा सुपुत्र वेदांत सास्तुरकर भारतीय सैन्यात 'लेफ्टनंट'पदी विराजमान

## आई पल्लवी आणि वडील किशोर सास्तुरकर यांच्या कष्टाचे चीज

**लातूर/प्रतिनिधी :** जिद्द, चिकाटी आणि देशसेवेची ओढ असेल तर यशाला नक्कीच गवसणी घालता येते हे लातूरच्या वेदांत सास्तुरकर याने सिद्ध करून दाखवले आहे. बिहारमधील गया येथील प्रतिष्ठित 'ऑफिसर्स ट्रेनिंग अकादमी' मधून आपले खडतर लष्करी प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करून वेदांत भारतीय सैन्य दलात 'लेफ्टनंट' पदी विराजमान झाला आहे. या यशानंतर प्रथमच राघवेंद्र कॉलनी, लातूर मध्ये आगमन झालेल्या वेदांतचे कुटुंबीयांनी आणि कॉलनीतील रहिवासी यांनी अत्यंत उत्साहात आणि भव्य मिरवणुकीने स्वागत केले.

**आई-वडिलांच्या डोळ्यांत आनंदाश्रू**

वेदांतचे वडील श्री. किशोर सास्तुरकर आणि आई सौ. पल्लवी सास्तुरकर यांनी आपल्या मुलाच्या या यशासाठी घेतलेल्या कष्टाचे आज चीज झाले. गया (बिहार) येथील



दीक्षांत संचलन सोहळ्यात खांद्यावर मानाचे 'स्टार्स' लागल्यानंतर वेदांत जेव्हा आपल्या लातूर शहरात परतला, तेव्हा पालकांनी त्याचे औक्षण करून आणि मिठी मारून स्वागत केले. हा क्षण उपस्थित असलेल्या प्रत्येक लातूरकरासाठी अभिमानाचा ठरला.


वेदांत सास्तुरकर यांचे राघवेंद्र कॉलनी मध्ये आगमन झाल्यानंतर पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. ढोल-ताशांच्या गजराने परिसर दुमदुमून गेला होता. 'भारत माता की जय' आणि 'वंदे मातरम'च्या घोषणांनी तरुणांमध्ये नवचैतन्य पसरले होते. ठिकठिकाणी रांगोळ्या काढून आणि फुलांचा वर्षाव करून या वीर सुपुत्राचे स्वागत करण्यात आले.

**OTA गया येथील खडतर प्रवास**

भारतीय सैन्यातील अधिकारी होण्यासाठी आवश्यक असणारे शारीरिक आणि मानसिक प्रशिक्षण वेदांतने गया येथील अकादमीत पूर्ण केले. अत्यंत कठीण शिस्त आणि प्रशिक्षणातून निघाल्यानंतर तो आता देशसेवेसाठी सज्ज झाला आहे. माझ्या आई-वडिलांनी दिलेले संस्कार आणि लातूरच्या मातीने दिलेली जिद्द यामुळेच मी इथपर्यंत पोहोचू शकलो, अशा भावना वेदांतने यावेळी व्यक्त केल्या.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर सेवानिवृत्त जयंती समितीच्या अध्यक्षपदी बलभीमराव कोथिंबीरे यांची निवड

**लातूर/प्रतिनिधी :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर सेवानिवृत्त जयंती समितीच्या अध्यक्षपदी संस्था चालक तथा सेवानिवृत्त संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष प्रा, बलभीमराव कोथिंबीरे



यांची निवड करण्यात आली, डॉ,बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे मागासवर्गीय सेवानिवृत्त कर्मचारी संघ लातूर ची बैठक संपन्न झाली याच बैठकीत वरील निवड करण्यात आली.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी बी, बी, गायकवाड हे होते, जयंती कार्यकारिणी खालील प्रमाणे निवडण्यात आली, अध्यक्ष प्रा, बलभीमराव कोथिंबीरे, उपाध्यक्ष प्रा, शंकर सोनवणे, माणिकराव पवार, विनायक बोरीकर, मोहन कांबळे सेलूकर, प्रा,डॉ, बाळासाहेब झरीकर, सचिव प्रा, एस, टी, मस्के, सह सचिव प्रा, डी, टी, सूर्यवंशी, बी, बी, गायकवाड, प्रा, देविदास शिंदे, अंकुश रोडे, रमेश श्रॅंगारे, संघटक प्रा, विजयकुमार श्रॅंगारे, सह संघटक एस, एस, धसवाडीकर, ए, बी, कांबळे, रमेश हणमंते, डी, एन, कांबळे, कोषाध्यक्ष लक्ष्मण धोत्रे, सह कोषाध्यक्ष एम, एम, माकणीकर, देगलूरकर, प्रमुख सल्लागार प्रा, अनंत लांडगे, डॉ, सुधाकर गुळवे, पी, एस, कांबळे, इंजि, ए, आर, लामतुरे, एन, डी, गायकवाड, अभिमन्यू सवई, डी, एस, साठे, प्रा, एस, टी, मस्के यांनी आभार मानल्या नंतर बैठक संपली.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**महाराष्ट्राची अर्थव्यवस्था दोन वर्षात 'यु ए इ' आणि सिंगापूर पेक्षा मोठी होणार...!**

## चिमटा दयाचा



लाच किती घ्यावी याबाबत लाज वाटली पाहिजे ! सरकारी पगार असताना लाच घेणे निर्लज्जपणाचे लक्षण आहे !!

# चुरशीच्या लढतीत कोल्हापूरचा रोहन पवार ठरला महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी किताबाचा मानकरी

**लातूर/प्रतिनिधी :** कोल्हापूर येथील रोहन पवार आणि पुण्याचा रामा कांबळे यांच्यातील चुरशीच्या लढतीत रोहन पवार याने ११ अंकाने राज्यस्तरीय महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी हा खुल्या गटातील किताब मिळविला. सव्वा लाख रुपये रोख, चांदीची गदा, सुवर्णपदक व प्रशस्तीपत्रक देऊन त्याचा सत्कार करण्यात आला.

विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ यांच्या मान्यतेने राष्ट्रधर्मपूजक – दादाराव कराड स्मृती प्रित्यर्थ लातूर येथील विश्वधर्मी मानवतातीर्थ रामेश्वर (रुई) च्या पवित्र यज्ञ भूमीवर विश्वातील एकमेव मानवतातीर्थ भवनाच्या विशाल प्रांगणात अभूतपूर्व राज्यस्तरीय महाराष्ट्र कुस्ती महावीर केसरी स्पर्धा-२०२६ आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धा गेल्या १९ वर्षापासून भरविण्यात येत आहेत. या स्पर्धेत पुण्याचा रामा कांबळे यांनी उपविजेते पद मिळविले. त्यांना रौप्यपदक व रोख रुपये १ लाखाचे पारितोषिक देण्यात आले. कोल्हापूर येथील सुशांत तांबुळकर याला तृतीय स्थानावर समाधान मानावे लागले. त्याला रुपये ५० हजार रोख व कांस्य पदक देण्यात आले. चतुर्थ क्रमांकावर पुणे येथील सागर देवकाते याला २५ हजार रुपये रोख व पदक देण्यात आले.

या स्पर्धेत एकूण २५० पेक्षा अधिक मल्लांनी भाग घेतला होता. हिंदी केसरी दिनानाथ सिंग, विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी पुणेचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड, रामेश्वरचे माजी सरपंच श्री. तुळशीराम दा. कराड, श्री. काशीराम दा, कराड, आ. रमेशअप्पा कराड, डॉ. हनमंत कराड, श्री. राजेश कराड, पै. विष्णूतात्या जोशीलकर, महाराष्ट्र केसरी आप्पासाहेब कदम, बापू साहेब मोरे, माईर्सचे कुलसचिव डॉ. रत्नदीप जोशी व प्रा. विलास कथुरे यांच्या हस्ते विजेत्या मल्लांना पारितोषिक देण्यात आले. या वेळी पै. राहुल बिराजदार आणि पै. निखील वणवे हे उपस्थित होते.

वजन गटातील विजेते पुढील प्रमाणे

प्रथमः सुवर्ण पदक, द्वितीय रौप्य पदक, तृतिय कांस्य पदक, व रोख रक्कम पुढे दिल्या प्रमाणे वजन गट प्रथम क्रमांक, द्वितीय क्रमांक, तृतीय क्रमांक, चुतर्थ क्रमांक रक्कम २०,०००; १५,०००; १०,०००; ८,००० याप्रमाणे ८६ किलो शुभम मगर, पुणे गौतम शिंदे, सोलापूर तुषार लवटे, लातूर तुषार झंजे सोलापूर ७४ किलो नामदेव कोकाटे, पुणे सोमनाथ शिंदे, करमाळा तेजस गोफणे सातारा समाधान भोसले धाराशिव ७० किलो शनि निंबाळकर, पुणे कुलदीप पाटील, कोल्हापूर महेश तातपुरे, रामेश्वर तुषार खामकर, पुणे ६५ किलो अविराज माने, सोलापूर चेतन भंडारी, रामेश्वर किरण सगे, पुणे बाळासाहेब चौरे, रामेश्वर ६१ किलो आविष्कार गावडे, पुणे अनिकेत पाटील, कोल्हापूर दिपक पवार, पुणे नारायण दहिफळे, रामेश्वर ५७ किलो आकाश सलगर, सोलापूर अजय निंबाळकर, पुणे लकी खरात, पुणे अनिकेत क्षिरसागर, बीड ७५ पेक्षा अधिक वर्षे वय असलेले अनेक मल्ल सहभागी झाले होते. या पैकी कोंड येथील शिवाजी गणपत मोरे हे विजेते ठरले तर कमलाकर माणिकराव मुळे हे उपविजेते ठरले. या पैलवानांचा योग महर्षी स्वातंत्र्य सेनानी वै. रामचंद्र गोपाळ शेलार उर्फ शेलार मामा स्मृती सुवर्ण, रौप्य व कांस्य पदके देऊन सत्कार करण्यात आला.



प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, मानवतातीर्थ भवन रामेश्वर रुई च्या मातीतून आज ना उद्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू निर्माण होतील. भारताच्या कुस्तीक्षेत्रामध्ये आपले नाव उज्वल करतील. कुस्ती या क्रीडा प्रकारात आपले मन आणि मनगट मजबूत होते. आजच्या तरुणांनी कुस्तीकडे वळणे गरजेचे आहे. श्री. बाबा निम्हण यानी स्पर्धेचे सूत्रसंचालन व धावते वर्णन केले. डॉ. महेश थोरवे यांनी आभार मानले.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## काटकसर आवश्यक

सध्याला ईस्त्राईल व इराण दरम्यान जे युद्धचालू आहे. याचा परिणात जगावर होणार आहे. इराण हा देश जगाला इंधन पुरविणारा देश आहे. युद्धामुळे इंधनाचा तुटवडा होण्याची शक्यता आहे. आज तरी भारताकडे स्टॉक असला तरी युद्धजन्य स्थिती दिर्घकाळ चालली किंवा जागतिक युद्धाचा भडका उडाला तर मोठी किंमत जगाला मोजावी लागणार आहे. ईस्त्राईलच्या पाठीशी अमेरिका आहे. जो काही खेळ चालू आहे तो अमेरिकेच्या पाठींब्यावर केला जात आहे. तरीही इराणाने शरणागती पत्कारली नाही. उलट इराणी नागरिक मोठ्या जिद्दीने दोन हात करण्यात तयार आहेत. त्यामुळे युद्धाची झळ बसणार आहे हे ओळखून चालण्याची गरज आहे. युद्ध तसे कोणालाही परवडणारे नाही. युद्धात अत्याधुनिक विनाशक शस्त्राचा वापर होताना दिसून येत आहे. महाभयंकर शस्त्रे बाहेर काढली नसली तरी ड्रोनच्या माध्यातून हल्ले चालू आहेत. इराणाच्या महत्वाच्या ठिकाणी बॉम्बहल्ले सुरूच आहे. इराणी नागरिक मोठ्या हिंमतने लढत आहेत. काही झाले तरी दिर्घ काळ युद्ध चालणे योग्य नाही. भारतात अजून स्वयंपाकाच्या गॅसचा तुटवडा नाही. जी काही ओरड दिसून येत आहे ती कृत्रिम असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे भारतीयांनी उगीच ओरड न करता, वस्तूस्थितीचा अंदाज घेतला पाहिजे. गॅस सिलेंडरचा तुटवडा सध्याला नाही असे जाहिर वक्तव्य सरकारकडून करण्यात आले आहे. स्टॉक सध्याला आहे. गॅस सिलेंडर उपलब्ध आहेत. घरगुती गॅसची गरज भासणार नाही. जे व्यावसायिक आहेत. ज्यांना हॉटेल मध्ये अनेक गॅसच्या टाक्या लागतात त्यांना पुरविणे आवघड आहे. त्यांना मात्र तुटवडा होण्याची शक्यता आहे. त्यांनी पर्याय शोधला पाहिजे. स्वयंपाकाचा गॅस हा सर्वांनाच लागतो. अन्न शिजविण्यासाठीची मोठी गरज आहे. अशा स्थितीत काटकसर करणे काळाची गरज आहे. घरगुती गॅसचा वापर हा मर्यादित केला पाहिजे. आवश्यक तेवढा वापर केल्यास कमी पडणार नाही. भारत हा पर्याय शोधणारा देश आहे. भारताने आगामी संकटाची चाहूल लागताच मुकाबल्यासाठी प्रयत्न केले आहेत. युद्धाची स्थिती पाहून नको ते विनाआधार बोलले जात आहे. जिल्हाप्रशासन घरगुती गॅसचा तुटवडा भासणार नाही असे सांगत असताना बाजारात मात्र वावड्या उठविल्या जात आहेत. त्यामुळे नागरिकांनी इतर कोणावर विश्वास न ठेवता थेट प्रशासनाशी संपर्क साधला पाहिजे. वस्तूस्थिती जाणून घेतली पाहिजे. मुळात आपल्या देशात म्हणा किंवा राज्यात काही नसताना बाऊ करण्याचा मोठा प्रयत्न होत असतो. युद्ध म्हटले की, झळ बसत असते. झळ लहान असो किंवा मोठी असो, ती सहन करावी लागते. त्यामुळे आफवावर विश्वास ठेवू नये किंवा अफवा पसरू नये हे लक्षात घेतले पाहिजे. चुकीचा संदेश समाजात पसरवू नये. युद्ध दिर्घ काळ चालणारा नाही असे संकेत दिसून येत आहे. ट्रम्प हे पक्के धोरणाचे नाहीत. कधीही किंवा कोणत्याही वेळी निर्णय फिरवू शकतात. त्यांना इराणाचा राजा खोमणी यांना ठार मारण्याचा हेतू तो सफल झाला आहे. तो ही त्यांनी इस्त्राईलच्या खांद्यावर बंदुक ठेवून कार्य सफलता केली आहे. अमेरिकेचा राग इराणावर आहे. हे जगातील जनतेला कळाले आहे. त्यामुळे जगात अमेरिका हा उघडा पडला आहे. जागतिक स्तरावर ईस्लामीक राष्ट्र बहुसंख्येने असले तरी ते गप्प आहेत. कोणाचाही आवाज अमेरिकेच्याविरोधात दिसून येत नाही. अमेरिका हा बेचिराख करू शकेल अशी भीती मनात असू शकते. त्यामुळे जगात अमेरिकेला समजावुन सांगण्याची हिंमत दिसून येत नाही हे उघड दिसून येत आहे. जगातील काही देश हे एकमेकाविरोधात जाण्यात तयार नाहित. इराणावर अनेक निर्बंध लादण्याची शक्यता आहे. इराणाने स्वतः होवून माघार घेतली तरच अमेरिकेच्या बंधनात राहावे लागेल. त्याच प्रमाणे मुळ हेतू हा इंधनाचा आहे. यावर डोळा अमेरिकेचा आहे हे उघड दिसून येते. भारताने तातडीने देशातील जनतेला गॅसचा तुटवडा निर्माण होऊ नये म्हणून एलपीजी संकट लक्षात घेता तातडीने आपला ‘प्लॅन-बी’ कार्यान्वित केला आहे. गॅसचा तुटवडा भासू नये यासाठी ऑस्ट्रेलिया, कॅनडा आणि अल्जीरिया यांसारख्या देशांकडून एलएनजी आणि एलपीजीचा अतिरिक्त साठा भारतात येण्यास सुरुवात झाली आहे. देशांतर्गत पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी केंद्र सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, भारतीय रिफायनरींनी एलपीजीच्या घरगुती उत्पादनात १० टक्क्यांनी वाढ केली आहे. यामुळे सामान्य नागरिकांना स्वयंपाकाच्या गॅससाठी रांगेत उभे राहण्याची किंवा तुटवड्याची भीती बाळगण्याची गरज भासणार नाही. भारत प्रामुख्याने कतार (४२%) आणि यूएई (११%) या देशांकडून गॅस आयात करतो. मात्र, युद्धामुळे या मार्गांत अडथळे येण्याची शक्यता असल्याने सरकारने आता ऑस्ट्रेलिया, कॅनडा, नॉर्वे आणि अल्जीरिया या देशांशी संपर्क साधून अतिरिक्त मालवाहतूक जहाजे मागवली आहेत. व्यावसायिक एलपीजीच्या वापरावर काही प्रमाणात निर्बंध लावून घरगुती ग्राहकांना प्राधान्य देण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. ट्रम्प यांचा टॅरिफ तणाव आणि जागतिक संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, भारताने केवळ खाडी देशांवर अवलंबून न राहता आपल्या आयात स्रोतांचे विविधीकरण केले आहे. या ‘प्लॅन-बी’ अंतर्गत भारताने पर्यायी देशांकडून गॅस कार्गो मागवले आहेत. गॅस संकट पाहता हॉटेल, रेस्टॉरंट्स आणि बिगर-गरजेच्या व्यवसायांवर याचा परिणाम होऊ शकतो. मात्र, सरकारने स्पष्ट केले आहे की, 'घरगुती एलपीजी' पुरवठा हीच आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. व्यावसायिक आस्थापनांकडून होणारी गॅसची साठेबाजी रोखण्यासाठी सरकारने कडक पावले उचलली असून पुरवठ्यावर सतत देखरेख ठेवली जात आहे. जे साठेबाज करीत आहेत त्यांच्यावर नजर ठेवली पाहिजे. देशात तसे पाहिले तर युद्धाचा परिणात होणार नाही. स्वयंपाकाचा गॅस कमी पडणार नाही तरी सर्वांना जपून स्वयंपाकाच्या घरगुती गॅसचा वापर करावा. अनाश्यक गॅस वापरू नये. युद्ध जरी समाप्त झाले तरी याचा परिणाम जागतिक स्तरावर दिर्घ काळ दिसून येणार आहे. त्यामुळे भारतात स्वयंपाकाच्या गॅसचा तुटवडा भासणार नाही. त्याच प्रमाणे अफवा ज्या पसरविल्या जात आहेत त्यावर विश्वास ठेवू नये.

# एमआयटी लातूर येथील श्री गणेश, श्री हनुमान, श्री महालक्ष्मी मंदिरे स्वधर्म आणि स्वत्वाचे प्रतीक

## प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांचे प्रतिपादन; मंदिरांचे दर्शन व विश्वमैदान क्रीडा संकुलाची पाहणी





**लातूर/प्रतिनिधी :** माईर एमआयटी शिक्षण संकुल, लातूर येथे उभारण्यात आलेली श्री गणेश, श्री दक्षिणमुखी हनुमान व श्री महालक्ष्मी ही मंदिरे स्वधर्म आणि स्वत्वाचे प्रतीक आहेत. मंदिररूपी संस्कारातून परिसरातील विद्यार्थी व रुग्णांमध्ये सकारात्मकतेची भावना निर्माण होऊन भारतीय संस्कृती आणि मूल्ये अधिक दृढ होतील, असे प्रतिपादन माईर एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे संस्थापक विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी केले.

एमआयटी शिक्षण संकुलातील श्री गणेश, श्री दक्षिणमुखी हनुमान व श्री महालक्ष्मी मंदिरांचे प्रा. डॉ. विश्वनाथ कराड व सौ. उषाताई विश्वनाथ कराड यांनी दर्शन घेतले तसेच ‘विश्वधर्मी विश्वमैदान’ क्रीडा संकुलाची पाहणी केली. यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी माईर एमआयटी शिक्षण संस्थेचे विश्वस्त श्री तुळशीराम दा. कराड, प्रगतिशील शेतकरी श्री काशिराम दा. कराड, एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड, कार्यकारी संचालक आ. रमेशअप्पा कराड, रजिस्टार डॉ. रत्नदिप जोशी, संचालक डॉ. महेश थोरवे, संचालक प्रा. तेजस कराड आदी उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना प्रा. डॉ. कराड म्हणाले की, जीवनात कधीही अहंकार बाळगू नये. संत साहित्यामध्ये नम्रतेचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

अहंकाराचा वारा न लागो राजसा ।
माझ्या विष्णुदासा भाविकांसी ।।
नामा म्हणे तया असावे कल्याण ।
ज्या मुखी निधान पांडुरंग ।।

या संतवचनांमधून नम्रतेचा संदेश मिळतो. ‘मला सर्वकाही कळते, मीच मोठा’ हा भाव मनात आला की माणूस इतरांपासून दूर जातो. इतरांशी नाते दृढ ठेवायचे असेल तर अहंकार सोडणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले. तसेच त्यांनी पुढे सांगितले की,

नवल अहंकाराची गोठी ।
विशेषें न लगे अज्ञानापाठीं ।
सज्ञानाचे झोंबे कंठीं ।
नाना संकटीं नाचवी ।।

अहंकार हा ज्ञानी माणसालाच अधिक ग्रासतो आणि त्याला विविध संकटांत अडकवतो. त्यामुळे जीवनात सर्वोच्च स्थानी पोहोचलात तरी नम्रता कायम ठेवली पाहिजे. आज जगभरात जे काही घडत आहे त्यातून आत्मपरीक्षणाची गरज अधोरेखित होते.

ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांच्या तत्त्वांचे प्रतीक असलेली ही मंदिरे एमआयटी शिक्षण संकुलातील विविध वैद्यकीय व शैक्षणिक संस्थांच्या मूल्यांची जाणीव करून देतात. त्याचबरोबर ‘विश्वधर्मी विश्वमैदान’ क्रीडा संकुलातून अनेक खेळाडूंना प्रेरणा मिळेल आणि येथून आदर्श खेळाडू घडतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

गेल्या तीन दशकांपूर्वी माईर एमआयटी संस्था स्थापन झाली. ‘विश्वशांती’ हे संस्थेचे ब्रीद असून या संस्थेने विश्वशांतीचा विचार पुढे नेण्याचे कार्य हाती घेतले आहे, असेही त्यांनी नमूद केले.

नम्र जाला भूतां ।
तेणें कोंडिलें अनंता ।।

या संतवचनाचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, नम्रतेमुळेच अनंत शक्ती प्राप्त होते. भारतमातेची प्रगती साधायची असेल तर समाजानेही नम्रतेचा मार्ग स्वीकारला पाहिजे.

यावेळी माईर एमआयटी शिक्षण संकुलातील विविध महाविद्यालयाचे प्राचार्य, विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जागतिक महिला दिनानिमित्त स्वसंरक्षण व महिला सुरक्षा मार्गदर्शन शिबिर



**लातूर/प्रतिनिधी :** जागतिक महिला दिनानिमित्त स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या उप-परिसर, लातूर येथे दिनांक १० मार्च २०२६ रोजी स्वसंरक्षण व महिला सुरक्षा मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले या कार्यक्रमासाठी आंतरराष्ट्रीय जपान कराटे संस्था, लातूर येथील श्री. दत्तात्रय बी. कदम तसेच त्यांच्या टीम मधील सुयश लांडगे, गणेश मेकले आणि महेक पटेल हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना स्वसंरक्षणाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले तसेच संकटाच्या प्रसंगी स्वतःचे संरक्षण कसे करावे याबाबत प्रात्यक्षिके घेण्यात आले. यावेळी प्रशिक्षिकांनी विविध स्वसंरक्षण तंत्रांचे प्रात्यक्षिक सादर करून विद्यार्थिनींना प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले. विद्यार्थिनींनी या प्रशिक्षणात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाच्या प्रसंगी उपपरिसराचे संचालक डॉ. संभाजी माने, प्राध्यापक डॉ. प्रमोद पाटील, डॉ. अनिल जायभाये, प्रा. मेघा साळुंके आणि डॉ. शिल्पा बिडकर व सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थितीत होते.

# दयानंद कला महाविद्यालयामध्ये जागतिक महिला दिन साजरा



**लातूर/प्रतिनिधी :** महिला दिनाचे औचित्य साधून दयानंद संवाद मंचाची स्थापना करण्यात आली.महिला तक्रार निवारण समितीच्या अध्यक्ष डॉ अंजली जोशी यांच्या संकल्पनेतून आगळावेगळा महिला दिन साजरा करण्यात आला.

कोणत्याही आस्थापनेमध्ये काम करत असताना महिला एकत्र आल्यावर एक खूप मोठी सपोर्ट सिस्टीम उभी राहू शकते. पण बऱ्याच ठिकाणी ती उभी राहताना दिसत नाही. अशावेळी दयानंद कला महाविद्यालयामध्ये एकत्र काम करणाऱ्या विविध पदांवरील ४९ महिला कर्मचारी यांनी एकत्र येऊन दयानंद संवाद मंच स्थापन केला. ज्यामध्ये या महिलांनी आपल्या दैनंदिन जीवनातील छोट्या-मोठ्या गोष्टींवर व्यक्त होऊन एकमेकांचे विचार जाणून घेतले. त्यातून परस्परांची सुख-दुःखे आणि स्वभावाची वैशिष्ट्ये समजण्यास मदत झाली. याच पद्धतीने अनेक विषयांवर यापुढेही चर्चा करण्याचे निश्चित करण्यात आले. यातून नकळत मैत्रीचा धागा विणताना सर्वजणींना एकमेकींचा आधार बनता येईल अशी अपेक्षा यावेळी महिला तक्रार निवारण समितीच्या अध्यक्षा डॉ. अंजली जोशी यांनी व्यक्त केली.

याप्रसंगी बोलताना त्यांनी महिलांना स्वतःवर खूप प्रेम करण्याचा विचार दिला. महिलांनी निर्भय होऊन जगावे, स्वतःला प्रेमाने बघावे, आपले आरोग्य चांगले ठेवून जीवनात आनंद निर्माण करावा असे मत व्यक्त केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी महिलांना शुभेच्छा देताना सांगितले की, महिलांमध्ये खूप काही साध्य करण्याच्या सुप्त शक्ती असते. त्यांना मुक्त वाव देऊन महिलांनी स्वतःला सिद्ध करावे. महाविद्यालयात काम करणाऱ्या सर्वच महिला या कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी होत्या. सर्वांनीच एकमेकींच्या हाताला हात लावून दिपप्रज्वलन केले.आई, पत्नी, बहीण, जाऊ, नणंद, सासू, वर्किंग वुमन व गृहिणी अशा अनेक भूमिका निभावताना, आयुष्यातील संघर्ष जगतांना आपण एकटे पडलो आहोत, आपलं कोणी ऐकून घेत नाही, कोणाच्याही मनात आपल्याला जागा नाही अशा अनेक विचारांना व्यक्त करण्याची एक हक्काची जागा सर्वांना मिळावी म्हणून या संवाद मंचाची स्थापना करण्यात आली. महिलांनी एकमेकांविषयी बोलण्यापेक्षा, आपल्यातच सुधारणा कशी घडवून आणता येईल, दुसऱ्यांविषयी बोलण्यापेक्षा एकमेकांशी कसं बोलता येईल,एकमेकींना कसं जाणून घेता येईल,एकमेकींचे प्रश्न कसे सोडवता येतील यावर कृती करणे आवश्यक आहे. असा संदेश या कार्यक्रमातून प्रतीत झाला. महिला स्वतःवर प्रेम करतात का या प्रश्नावर सर्वच महिला व्यक्त झाल्या.अतिशय सुंदर आणि मार्मिक उत्तरांनी हा कार्यक्रम रंगला होता. कोणी गाण्यातून तर कोणी कवितेतून तर कोणी विचारातून अतिशय प्रामाणिकपणे अभिव्यक्त झाल्या. या निमित्ताने मैत्रिणींना नव्याने ओळखता आले. त्यांच्यातील कितीतरी गोष्टी नव्याने कळाल्या. कोणी छान गात, कोणी छान लिहित, कुणी कविता करतं, तर कोणी स्वयंपाक छान करतं, कोणाला सुंदर राहायला, दिसायला आवडतं, कुणाला साधेपणाने जगायला आवडतं, कोणी दुसऱ्यांच्या टिकांना इग्नोर करतं, तर कोणी मनावर घेऊन फार विचार करतं अशा कितीतरी विचारांच्या, भावनांच्या सुंदर छटा या कार्यक्रमातून उमटल्या! प्रत्येकीने नृत्य आणि खेळाचा आनंद घेऊन पुन्हा बालपण अनुभवलं!

कार्यक्रमाच्या अखेरीस सर्व महिलांचा फुलांचा मुकुट घालून सन्मान करण्यात आला. मैं शक्ती हू,कर सकती हुं या प्रेरणादायी गीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. महाविद्यालयाच्या महिला तक्रार निवारण समितीच्या सदस्य डॉ.दुर्गा शर्मा यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. तर प्रा. सुवर्णा लवंद यांनी सर्वांचे आभार मानले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, सर्व प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी यांनी महिलांना शुभेच्छा दिल्या.

## टाचांवर भेगा पडतात? अशी घ्या काळजी होणार नाही त्रास

अनेकांना भेडसावणारी मुख्य समस्या म्हणजे पाय आणि टाचांची कोरडी त्वचा! यामुळे अनेकांना भेगा पडतात यामुळे चालण्यास त्रास होतो. मात्र, तज्ञ म्हणतात की काही घरगुती उपाय या समस्येवर चांगला उपाय आहे. चाल तर जाणून घेऊया टाचांवरील भेगा दूर करण्याचे काही नैसर्गिक मार्ग..

तज्ज्ञांचं म्हणणं आहे की, घाण आणि कोरडेपणा हे टाचांवर भेगा पडण्याचे मुख्य कारण आहे. म्हणून, दररोज पाय स्वच्छ धुण्याचा सल्ला तज्ञ देतात. चांगल्या परिणामांकरिता पाय धुतल्यानंतर, ते मऊ कापडाने पुसून घ्या आणि मॉइश्चरायझर लावा. जर समस्या जास्त त्रासदायक असेल तर, एक टब कोमट पाण्याने भरा. त्यात दोन चमचे मध घाला आणि पाय भिजत ठेवा. दहा ते पंधरा मिनिटांनंतर, भेगा पडलेल्या भागाला हळूवारपणे घासून घ्या. तज्ञांचं म्हणणं आहे की, हे केवळ नैसर्गिक मॉइश्चरायझर म्हणून का करत नाही तर बॅक्टेरिया देखील नष्ट करतात.

**मॉइश्चरायझर:** तुमच्या टाचांवरील कोरडी त्वचा पुन्हा हायड्रेट करण्यासाठी, वारंवार मॉइश्चरायझर लावा. तज्ञ दिवसातून किमान दोनदा पायांना मॉइश्चरायझर लावण्याची शिफारस करतात. मेयोक्लिनिकच्या अभ्यासानुसार, काही मॉइश्चरायझरमध्ये युरिया, सॅलिसिलिक ॲसिड किंवा अल्फा हायड्रॉक्सी ॲसिड असते, हे त्वचा मऊ करणारे घटक म्हणून काम करतात जे मृत त्वचा काढून टाकण्यास मदत करतात. तसंच, तज्ञ रात्री झोपण्यापूर्वी शिया बटर लावण्याची शिफारस देखील करतात.

**हा पेस्ट उत्तम:** ओट्स, मध, बदाम तेल, दूध आणि साखर थोड्या प्रमाणात मिसळून जाडसर पेस्ट तयार करा. तयार केलेली पेस्ट टाचांवर लावा आणि थोडा वेळ मालिश करा. ३० मिनिटांनंतर पाय धुवा आणि नंतर नारळाचे तेल लावा. असं नियमितपणे केल्याने टाचांवरील मृत त्वचा निघून जाते आणि त्या मऊ होतात असं म्हटलं जाते.

**पायांची मालिश:** तज्ञ दररोज रात्री झोपण्यापूर्वी हळद आणि ऑलिव्ह ऑइलची पेस्ट टाचांना लावण्याचा सल्ला देतात. पायाला लावलेले मिश्रण बेडशीटला चिकटू नये म्हणून पायात मोजे घाला. सकाळी पाय कोमट पाण्याने धुवा. असं निमयमितपणे केलं तर काही दिवसांतच तुम्हाला चांगले परिणाम दिसून येतील. झोपण्यापूर्वी तुमच्या टाचांवर पेट्रोलियम जेली लावून काही वेळ मसाज केल्यास ते त्वचेत चांगले शोषले जाईल. परिणामी त्वचा मऊ होईल.

**नारळाचं तेल:** तज्ञ नारळाच्या तेलात किंवा बदामाच्या तेलात हळद मिसळून भेगा पडलेल्या भेगांवर पोल्टिस म्हणून लावण्याची शिफारस करतात. यामुळे सूज आणि वेदना लवकर दूर होतात असं म्हटलं जातं. दररोज रात्री नारळाच्या तेलाने हलक्या हाताने मालिश करणे देखील प्रभावी आहे. मात्र, मालिश केल्यानंतर मोजे घालणे गरजेचं आहे. कारण यामुळे पाय मऊ होतात.

तसंच, या ऋतूत बाहेर जाताना मोजे घालण्याचा सल्ला दिला जातो. त्याचप्रमाणे, मऊ, सैल शूज घालण्यास प्राधान्य दिले पाहिजे असं म्हटलं जातं. टाचांमुळे पायांवर दबाव वाढतो यामुळे टाचांवर भेगा पडतात. नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनच्या एका अभ्यासात असं म्हटलं आहे की, नारळाचे तेल त्वचेला मॉइश्चरायझ म्हणून काम करते आणि त्वचेच्या विकारांसारखी लक्षणे सुधारते.

**अन्न:** पालक, मासे, अक्रोड आणि सोया यांसारखे ओमेगा-३ फॅटी ॲसिडयुक्त पदार्थ रोजच्या आहारात समाविष्ट करावेत. व्हिटॅमिन ई समृद्ध असलेले वनस्पती तेल, हिरव्या पालेभाज्या, गहू, मासे, संपूर्ण धान्य, काजू इत्यादींची देखील शिफारस तज्ञ करतात.

## सर्दी आणि खोकल्यामुळे त्रस्त आहात? या चमत्कारिक आयुर्वेदिक लाडूने मिळेल आराम

हवामान बदलाबरोबर खोकला, सर्दी आणि ताप यासारख्या समस्या सामान्य त्रास देतात. म्हणूनच, हिवाळ्यात आपल्या आरोग्याची काळजी घेणं खूप महत्वाचं आहे. या काळात शरीर उबदार आणि निरोगी ठेवण्यासाठी चांगलं आणि निरोगी अन्न खाणं उचित आहे, कारण हिवाळ्यात खोकला आणि सर्दी फार सामान्य समस्या ठरते. कारण थंडी, कोरडी हवा विषाणूंचा प्रसार करण्यास मदत करते. तसंच कमी सूर्यप्रकाशामुळे रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होते, ज्यामुळे संसर्गाचा धोका वाढतो आणि नाक बंद, घसा खवखवणे, शिंका येणे तसंच खोकला यासारख्या समस्या उद्भवतात.या समस्या टाळण्यासाठी बरेच लोक विविध घरगुती उपाय करून पाहतात आणि वेगवेगळी औषधे घेतात. या समस्यांवर, प्रसिद्ध आयुर्वेदिक तज्ज्ञ डॉ. गायत्री देवी यांनी आयुर्वेद या समस्यांपासून लवकर आराम देऊ शकतो याबद्दल माहिती दिलीय. त्यांच्या मते, खोकला आणि सर्दी यावर आयुर्वेदात अनेक प्रभावी उपाय आहेत. ज्यामुळे दोन दिवसांत आराम मिळू शकतो. या समस्येपासून त्वरित आराम देणाऱ्या अशाच एका खास हर्बल उपायाबद्दल जाणून घ्या. हा उपाय कसा तयार करायचा आणि त्यासाठी कोणते घटक आवश्यक आहेत? या लेखात सर्वकाही जाणून घ्या...

**सर्दी आणि फ्लू टाळण्यासाठी आयुर्वेदिक उपाय**

हे अनोखे आयुर्वेदिक उपाय तयार करण्यासाठी तुम्हाला जास्त पैसे खर्च करण्याची किंवा जास्त प्रयत्न करण्याची गरज नाही. तुम्हाला फक्त तीन घटकांची आवश्यकता आहे.

**साहित्य**

पहिली गोष्ट म्हणजे आलं - मात्र हा उपाय करण्यासाठी ताजं आलं वापरायचं नाही त्यासाठी वाळलेला आल्याचा वापर करा.

दुसरी गोष्ट म्हणजे गूळ.तिसरी गोष्ट म्हणजे गाईचं तूप.

**कृती:** तयार करण्यासाठी, तिन्ही घटक समान प्रमाणात घ्या. एका भांड्यात सर्व घटक एकत्र करा आणि चांगले मिसळा. नंतर, मिश्रणाचे लहान गोळे किंवा लाडू तयार करा. अनोखे घरगुती आयुर्वेदिक औषध तयार आहे.

हे आयुर्वेदिक औषध कसं काम करते? आयुर्वेदानुसार, खोकला, सर्दी आणि विषाणूजन्य संसर्ग यासारख्या आजारांनी ग्रस्त असलेल्या लोकांनी हे आयुर्वेदिक लाडू घ्यावेत. तयार केलेले लाडू मुले आणि प्रौढ दोघेही घेऊ शकतात. किंवा तयार केलेल्या गोळ्या तोंडात ठेवून त्या विरघळू देणे पुरेसे आहे. तज्ञांचं म्हणणं आहे की, हे ॲलर्जीने ग्रस्त असलेल्या मुलांसाठी एक अतिशय प्रभावी औषध आहे. ते संसर्ग रोखते आणि खोकला आणि सर्दीपासून लवकर आराम देते. शिवाय, हे औषध पोटाच्या समस्यांसाठी देखील प्रभावी मानले जाते. पोट फुगलेल्यांना ते आराम देते. तसंच हे पचनाच्या समस्या देखील कमी करते. शिवाय, कमकुवत प्रतिकारशक्ती असलेल्या आणि कमकुवत दिसणाऱ्यांसाठी हे सर्वात प्रभावी असल्याचं तज्ञांचं म्हणणं आहे.

किती लाडू खाणे सुरक्षित आहे? तज्ञ दिवसातून एकदा किंवा दोनदाच ते खाण्याची शिफारस करतात. आयुर्वेदानुसार, गूळ आणि सुकं आलं हे आरोग्यासाठी फायदेशीर मानले जातात. दोन्हीही सर्दी आणि खोकल्याशी लढण्यास मदत करतात. सुकं आलं खाल्ल्याने ेष्मा कमी होतो आणि श्वसनाच्या समस्या टाळण्यास खूप फायदेशीर आहे. परंतु, तुपाबाबत एक सल्ला असा आहे की ज्या लोकांना सायनससारख्या समस्यांमुळे वारंवार सर्दी आणि खोकला होतो त्यांनी तूप खाणं टाळावं. असे मानले जाते की ते सर्दी आणि खोकला वाढवू शकते.

# नेपाळमधील बदल



चीनधार्जिणे ओली आणि त्यांच्या पक्षाची वाताहात, हा भारतासाठी दिलासा. भारताकडून बालेन शहा यांचे अभिनंदन करण्यात आले. पाकिस्तानी हस्तकांसाठी नेपाळच्या भूमीचा उपयोग बालेन शहा यांनी करू देऊ नये.

नेपाळमध्ये बालेन शहा यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय स्वतंत्र पक्षाने मोठा विजय मिळवला. युवा किंवा 'जेन झी' आंदोलकांना मतदारांनी कौल दिला. याच आंदोलनाने आधीचे सरकार उलथवून टाकले होते. नेपाळमधील नागरिकांचा प्रस्थापितांवर विश्वास उरलेला नाही, हे निवडणूक निकालातून स्पष्ट झाले. त्याचवेळी, स्थिर सरकार येणे मतदारांना महत्त्वाचे वाटते, असा निष्कर्ष देखील काढावा लागतो. १६५ पैकी ११७ जागा बालेन शहा यांच्या पक्षाला मिळाल्या, याचा तोच अर्थ आहे. नेपाळी काँग्रेस पक्ष केवळ अस्तित्वापुरता उरला आहे.

अनेक दिग्गजांना मतदारांनी निवडणुकीत धूळ चारली. वारंवार सरकार बदलले जात असल्याने नेपाळ कमालीचा अस्थिर बनला होता. भ्रष्टाचाराने टोक गाठले होते. जवळपास वीस वर्षे हे चित्र कायम होते. याच पार्श्वभूमीवर समाजमाध्यमांवर 'नेपोकिड' ट्रेंडमध्ये होता. नेत्यांच्या मुलांची मस्ती जिरवण्यासाठी नेपाळमधील तरुणाई सज्ज झाली आणि के. पी. ओली शर्मा यांच्या सरकारच्या विरोधातील आंदोलनातून ती संधी आली. बांगला देशानंतर अमेरिकेच्या पुढाकाराने आंदोलन झाले असले तरी त्याला नेपाळच्याच राज्यकर्त्यांनी पाया मिळवून दिला, हे मान्य करावे लागेल. नेपाळमध्ये चीनचा वाढता प्रभाव, हे भारतासाठी कायम आव्हान राहिले आहे. ओली यांचा नेपाळ कम्युनिस्ट पक्ष चीनचे हितसंबंध जपण्यात कायम अग्रेसर राहिला. आताच्या निवडणुकीत मतदारांनी त्या पक्षाची सफाई केली आहे. बालेन शहा अभियंता आहेत. रॅप गायक, ही त्यांची ठळक ओळख. काठमांडू शहराचे महापौर म्हणून त्यांनी स्वतःचा ठसा उमटवला. याच पदामुळे आणि तरुण पिढीतील त्यांच्या लोकप्रियतेमुळे ते नेपाळच्या राजकारणात केंद्रस्थानी आले. जी व्यक्ती नेपाळची चार वेळा पंतप्रधान होती, अशा ओली यांनाच झापा या मतदारसंघात बालेन शहा यांनी तब्बल पन्नास हजार मतांनी पराभूत केले. हा पराभव नेपाळी जनमानसाची प्रातिनिधिक भावना व्यक्त करणारा म्हणावा लागेल.

**अपेक्षांचे ओझे**

आपल्या रॅप संगीतातून बालेन शहा यांनी समाजातील दारिद्र्य, विषमता, शोषण, भ्रष्टाचार यावर बोट ठेवले. यातून ते तरुणाईच्या गळ्यातील ताईत बनले; पण मतदारांना स्वप्न दाखविणे वेगळे आणि त्यांच्या अपेक्षा प्रत्यक्षात आणणे वेगळे! राजकीय व्यवस्थेत कायम उभे राहण्यासाठी, सत्तेचे सिंहासन कायम टिकवण्यासाठी असंख्य तडजोडी कराव्या लागतात. याला बालेन शहा कसा प्रतिसाद देतात, हे नजीकच्या काळात दिसणार आहे. प्रचारादरम्यान त्यांनी भारत आणि चीन यांच्यावर बरीच चिखलफेक केली. दोघांनाही सारख्याच अंतरावर ठेवण्याची भूमिका मांडणारे बालेन शहा काही पहिले नव्हेत! पण नेपाळची नाळ नैसर्गिकरीत्या भारताच्या परंपरेशी जुळलेली आहे, याचे भान नेपाळमध्ये अनेक नेत्यांना राहात नाही. जेन झी आंदोलन आणि निवडणूक निकाल, यानंतर नेपाळमध्ये झालेला बदल अमेरिकेसाठी अनुकूल आहे.

चीनचे हितसंबंध छाटण्यासाठी अमेरिका अधिकाधिक सक्रिय राहणार, यात शंका नाही. अशावेळी बालेन शहा त्यांच्या इशार्यावर चालणार का? तसे झाल्यास त्यांच्याकडून आता तरी दाखविल्या जात असलेल्या स्वतंत्र भूमिकेचे काय? असे अनेक प्रश्न आहेत. अवघ्या चार वर्षांपूर्वी स्थापन झालेला पक्ष जुन्या आणि परंपरागत पक्षांना सत्तेतून बेदखल करतो, हे वेगळेपण. नेपाळमधील नागरिकांना भारताबरोबर मैत्री हवी आहे. वर्षानुवर्षे नेपाळ आणि भारत यांच्या सीमा खुल्या आहेत. अनेक बाबतीत नेपाळ भारतावर अवलंबून आहे. भारतात नोकरी- व्यवसाय करणार्या नेपाळी नागरिकांची संख्या फार मोठी आहे. भारतीय लष्करात भारतीय अथवा नेपाळी व्यक्तीच प्रवेशासाठी पात्र असते. हे सर्व घटक दोन देशांमधील साहचर्य दर्शवितात. याला जेव्हा जेव्हा तडा देण्याचा प्रयत्न नेपाळमधील राज्यकर्त्यांकडून होतो, त्या-त्या वेळी त्यांचे हितसंबंध साधतात, मात्र नेपाळी जनतेला विनाकारण त्रास सहन करावा लागतो. या वस्तुस्थितीची जाणीव बालेन शहा ठेवतील, ही अपेक्षा आहे.

## गाढ झोपेसाठी काही महत्वाचे



नियमित वेळ पाळा: दररोज रात्री एकाच वेळी झोपण्याची आणि सकाळी एकाच वेळी उठण्याची सवय लावा स्क्रीन वेळ कमी करा: झोपण्यापूर्वी किमान एक तास मोबाईल, टीव्ही किंवा लॅपटॉप वापरणे टाळा शांत वातावरण: बेडरूममध्ये अंधार, शांतता आणि आरामदायक तापमान ठेवा कॅफिन आणि अल्कोहोल टाळा: संध्याकाळनंतर चहा, कॉफी किंवा अल्कोहोलचे सेवन करू नका कोमट दूध: रात्री झोपण्यापूर्वी हळद किंवा जायफळ टाकून कोमट दूध प्या, ज्यामुळे शरीराला आराम मिळतो व्यायाम: दिवसा नियमित व्यायाम करा, पण झोपण्यापूर्वी जड व्यायाम टाळा रात्री जाग आल्यास काय करावे? अंथरुणातून उठा: जर २०-३० मिनिटांत झोप आली नाही, तर अंथरुणातून उठा आणि दुसऱ्या खोलीत जाऊन पुस्तक वाचा किंवा मंद संगीत ऐका, सुचवते. दिवे कमी ठेवा: उजेड टाळा आणि शांत क्रियाकलाप करा

# काही गुरुच कॉपी करण्यासाठी गाईड बनतात

***फेब्रुवारी-मार्चमध्ये देशाचा जीडीपी वाढतो की नाही माहीत नाही, पण गावागावातील झेरॉक्स सेंटरची उलाढाल नक्कीच वाढते आहे. महाराष्ट्र बोर्ड परीक्षा कॉपी प्रकरण १७ शिक्षकांवर गुन्हे गुरुच कॉपी करण्यासाठी 'गाईड' बनतात तेव्हा...***



महाराष्ट्रात नुकत्याच १२ वीच्या परीक्षा संपल्या आणि दहावीच्या सध्या सुरू आहेत. थोडक्यात हा सध्याचा काळ हा परीक्षांचे वारे वाहण्याचा आहे. पण हे वारे ज्ञानाचे नसून 'मायक्रो-झेरॉक्स'च्या वासाचे आहेत. छत्रपती संभाजीनगरमधील एका केंद्रावर चक्क १७ शिक्षकांवर गुन्हा दाखल झाला, कारण तिथे 'ड्रोन'ने सामूहिक कॉपीचा कळस टिपला. भारतीय लोकशाहीचा हा 'एज्युकेशन पॅटर्न' पाहून आता थक्क व्हायची वेळही निघून गेली आहे, आता फक्त कपाळावर हात मारून घेण्याचेच उरले आहे.

१. कॉपी केंद्रे: लोकशाहीचे ङ्गमुक्त विद्यापीठफ

लोकशाहीत ङ्गसमानताफ असावी असे संविधान सांगते. आपल्या शिक्षणव्यवस्थेने ती समानता ङ्गकॉपीफमध्ये आणली आहे. हुशार विद्यार्थ्याने रात्रभर जागून अभ्यास करायचा आणि मागच्या बाकावरच्या ङ्गभाईफने खिडकीतून येणाऱ्या ङ्गप्रसादाफच्या जोरावर ९०% मिळवायचे, हीच ती खरी ङ्गसंधीची समानताफ!

ज्या परीक्षा केंद्राबाहेर ङ्गयेथे शांतता राखाफ अशी पाटी असायची, तिथे आता ङ्गयेथे झेरॉक्स स्पष्ट मिळतेफ अशा अदृश्य पाट्या लागल्या आहेत. परीक्षार्थी आता पेन विसरतील, पण ङ्गमायक्रोफ विसरत नाहीत. गणिताचा पेपर असो वा विज्ञानाचा, प्रश्नाचे उत्तर डोक्यात नसले तरी चालेल, पण ते पायमोज्यात किंवा पॅडच्या खालच्या बाजूला मात्र नक्कीच असते. हे आधुनिक भारताचे मेक इन इंडिया मॉडेल आहे का?

२. गुरुजी आता बाउन्सर झालेत!

साने गुरुजींच्या महाराष्ट्रात शिक्षकाला 'देव' मानले जायचे. आजच्या शिक्षकाची अवस्था एखाद्या सुरक्षा रक्षका सारखी झाली आहे. वर्गात कॉपी पकडली तर केंद्राबाहेर पालकांचे टोळके बघून घेण्याची धमकी देते. बिचारा शिक्षक तरी काय करणार? त्याने ज्ञानदान करायचे की स्वतःचे संरक्षण?

त्यात भर म्हणून प्रशासकीय कामांचा डोंगर. जनगणना, मतदान याद्या, आणि आता कॉपीमुक्तफ अभियानाचे पंचनामे. बीडमधील घटनेत तर साक्षात शिक्षकांनीच विद्यार्थ्यांच्या हातात उत्तरांच्या चिठ्ठ्या दिल्या. याला काय म्हणावे? विद्या विनयेन शोभते की विद्या कापिट्येन शोभते ? जेव्हा गुरुच 'गाइड' बनून कॉपी पुरवतो, तेव्हा त्या लोकशाहीचा पाया किती भक्कम असेल, याची कल्पना न केलेलीच बरी.

३. लोकशाही आणि शिक्षण:आपली लोकशाही संख्याबळा वर चालते आणि आपली शिक्षणव्यवस्था टक्क्या च्या बळावर. ९५% मिळवून सुद्धा साधे बँक चलन भरता न येणारी पिढी आपण घडवत आहोत. हे लोकशाहीचे सर्वात मोठे अपयश आहे. आपण पदव्यांचे ढीग लावले आहेत, पण त्या पदव्यांच्या कागदांना भजीचा वास येतो, कारण त्या पदव्यांना वास्तवाचा आधार नाही.

आजची शिक्षणव्यवस्था म्हणजे अशा एका कारखान्यासारखी आहे, जिथे कच्चा माल म्हणून जिज्ञासा टाकली जाते आणि बाहेर तयार माल म्हणून बेरोजगार पदवीधर निघतात.फ

४. कॉपी पुरवणारे सुपर-पॅरेंट्सफ

ड्रोनची नजर: सरकारने कॉपी रोखायला ड्रोन लावले. पण कल्पकता बघा, विद्यार्थी आता ड्रोनलाच हायजॅक करून त्याच्या पायाला चिठ्ठी बांधून वर्गात मागवतील, अशी परिस्थिती आहे!

झेरॉक्स अर्थव्यवस्था: फेब्रुवारी-मार्चमध्ये देशाचा जीडीपी वाढतो की नाही माहीत नाही, पण गावागावातील झेरॉक्स सेंटरची उलाढाल नक्कीच वाढते आहे.

पालकांचा उत्साह: पोरगा परीक्षेला बसलाय की युद्ध आघाडीवर? पालकांची केंद्राबाहेर अशी गर्दी असते जणू काही ङ्गऑपरेशन शक्तीफ सुरू आहे. मुलाला पाणी देण्याच्या बहाण्याने उत्तरांचे अख्खे गाईडच खिडकीतून आत सरकवणारे सुपर-पॅरेंट्स पाहून थक्क व्हायला होते.

५. वास्तव काय सांगते?आपण १० वी-१२ वीला विकासाचे टप्पे म्हणतो, पण प्रत्यक्षात ते भ्रष्टाचाराचे पहिले धडे ठरत आहेत. एखादा विद्यार्थी कॉपी करून पास होतो, तेव्हा तो फक्त परीक्षा पास होत नाही, तर ङ्गप्रामाणिकपणापेक्षा जुगाड महत्त्वाचा आहेफ हा लोकशाही विघातक धडा आयुष्यभरासाठी शिकतो.

शिक्षण व्यवस्थेचे विदारक वास्तव (तक्ता):

✲ वर्ष संकल्पना वास्तव

✲ १९६० गुरुजींचा सन्मान - गुरुजींची धमकी

✲१९९० अभ्यासाचा ताण- कॉपीचे प्लॅनिंग

२०२६ डिजिटल इंडिया - डिजिटल कॉपी आणि पेपर लीक आपल्याला खरोखरच विश्वगुरू व्हायचे स्वप्न पाहायचे असेल, तर प्रथम आपल्याला गावोगावी फोफावलेली ही कॉपी केंद्रे उद्ध्वस्त करावी लागतील. ज्या ठिकाणी सरस्वतीचा लिलाव होतो, तिथे ज्ञान गंगेचे पूजन करणे हा निव्वळ दांभिकपणा आहे. आज आपण ज्ञान केंद्रे उभी करण्याच्या बाता मारतो, पण प्रत्यक्षात आपण अशा डिग्रीच्या गिरण्या चालवत आहोत, जिथून बाहेर पडणारा प्रत्येक पिठाचा गोळा हा विवेकहीन आणि स्वाभिमानशून्य आहे.

शिक्षकाचा खरा सन्मान म्हणजे वर्षातून एकदा त्याला आदर्श शिक्षक नावाचे प्लास्टिकचे ढाल आणि शाल देऊन मिरवणे नव्हे; तर त्याला व्यवस्थेच्या गुलामीतून मुक्त करून निर्भयपणे आणि मानाने वर्गात खडू धरायला देणे हा आहे. आजचा शिक्षक हा ज्ञानदान करणारा ऋषी उरला नसून, तो कधी निवडणुकीचा कारकून, कधी खिचडीचा हिशोबनीस, तर कधी नेत्यांच्या पुतळ्यांचे रक्षण करणारा पहारेकरी झाला आहे. जेव्हा एखादा शिक्षक कॉपी पकडण्याचे धाडस करतो, तेव्हा लोकशाहीचे रक्षक गप्प बसतात आणि गुंडशाहीचे प्रतिनिधी त्या शिक्षकाची लायकी काढतात.लोकशाहीचा डोलारा तेव्हाच ताठ मानेने उभा राहील, जेव्हा मतदाराच्या हातातील हिशोबी नोट आणि विद्यार्थ्याच्या खिशातील नकल करणारी चिठ्ठी कायमची हद्दपार होईल. कारण, ज्या हातांना परीक्षेच्या वेळी चोरी करण्याची सवय लागते, तेच हात भविष्यात लोकशाहीच्या मतपेटीची आणि देशाच्या तिजोरीची लूट करायला कचरत नाहीत. आपण आज कापिट्या पेरतोय, उद्या त्यातून काय उगवणार आहे?

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



दैनंदिन आहारात कॅल्शियम, लोह यांसारखे घटक महत्त्वाचे असतात. हिमोग्लोबीन व विविध जीवनसत्त्वांची पातळी शरीरात योग्य राखली गेली, तर डॉक्टरांपासून दूर राहता येईल. दैनंदिन आहारात कॅल्शियम, लोह यांसारखे घटक महत्त्वाचे असतात. हिमोग्लोबीन व विविध जीवनसत्त्वांची पातळी शरीरात योग्य राखली गेली, तर डॉक्टरांपासून दूर राहता येईल. तुम्हाला आरोग्य चांगलं ठेवायचं असेल आणि डॉक्टरपासून दूर राहायचं असेल, तर शरीराकडे लक्ष देणं गरजेचं आहे. कॅल्शियम, लोह गरजेचं शरीराला तंदुरुस्त ठेवण्यासाठी काही बाबी लक्षात घेणं गरजेचं आहे. कॅल्शियम आणि लोहाची शरीराला आवश्यकता असते. कॅल्शियम आणि लोहाच्या कमतरतेमुळे तुम्हाला चालता-फिरताना त्रास होऊ शकतो


## २ Joke विनोद




सारीका : माझे पती वाघाप्रमाणे शूर, चित्याप्रमाणे चपळ आणि हत्तीप्रमाणे डोलत जाणारे आहेत.

रेखा : असं, त्यांना बघण्यासाठी किती रुपयाचं तिकीट काढावं लागणार.

## ३ Message संदेश




Santa: Tum 1 bar me kitny admi utha saktey ho?

Pehalwan: 5

Santa: Bas! Tum se acha to hamara murgha hai jo subah subah pura mohalla utha deta hai.

## ४ Thought सुविचार




ज्याला नीट खायला प्यायला मिळते, त्याने आपले कर्तव्यही चोख बजावावे. -थॉमस फुलर

**संस्कृत सुभाषित**

**एकोदरसमुद्भूता एकनक्षत्रजातकाः ।**
**न भवान्ति समाः शील यथा बदरिकाष्टकाः ॥**

अर्थ : एकाच बोराच्या झाडावर उत्पन्न झालेले काटे एक दुसऱ्यासारखे नसतात तसेच एका आईच्या पोटी जन्मलेले, एकाच नक्षत्रावर जन्मलेले सर्व लोक समान नसतात.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. रमेश देवबरोबरच्या या सिनेमात सीमा खलनायिका होती
६. ऐनवेळी कच खाणारा
११. न्याय
१२. सोशिकपणा
१४. नवरा
१५. अरण्य
१६. लोटी
१८. उगवत्या सूर्याचा देश
२१. च्या पुढे, समक्ष
२३. वेळेचा कमीत कमी भाग
२४. विरोध, प्रतिबंध
२७. पत, प्रतिष्ठा
२८. शंकराजवळचे चर्मवाद्य
२९. टप्प्याने टप्प्याने केलेला प्रवास
३२. अवधान, लक्ष
३३. भडक
३६. पळून जाणे
३९. कलावंत
४१. मत नोंदवण्याचा कालबाह्य कागद
४४. सोसाट्याचा वारा
४५. पवित्र
४६. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
४९. परिस्थिती, कालाचे परिमाण
५२. सामान
५३. बस्तान
५४. मज्जाव
५६. आश्रय, थारा
५८. प्रकाश निर्माण करणारा सूर्य
६०. वाहणारी हवा
६१. जन्मदाते
६३. पाणी
६५. दक्ष
६६. यजमान
६७. आरोप, बालंट
६८. प्रयाण
६९. लोकमानस
७१. इच्छा, आकांक्षा (हिंदी)
७३. आपल्या उत्तर सीमेवरील एक राष्ट्र
७५. किंचित ओलावलेले (डोळे) (हिंदी)
७६. कामाचा उरका
७८. शिव
८०. अवाजवी
८२. भाजपा नेते 'नितीन ----'
८४. संथ
८५. स्तुतीची गाणी
८६. दुःखी होणे, वेदनेने ओरडणे

### उभे शब्द

१. लकब
२. खिशाला चाट
३. धास्ती, भीती
४. आपले राष्ट्रगीत
५. आलटापालट
७. खून
८. शिकारीसाठी हेरलेला प्राणी
९. डोसा
१०. शरीर, काया
१३. गलबताचे कापड
१७. भाकरी व इतर पदार्थांचा कुस्करा, दूधभाकरी
१९. वैमानिक (इंग्रजी)
२०. अंकुर
२२. रम्य, मनोहर
२५. दात
२६. अंधार
२७. फोडणीचे वरण
३०. प्रचंड
३१. जपजाप्य
३४. बगळा
३५. थेळ, सरळ
३७. लोकरीचा एक प्रकार
३८. लग्नकार्याचे लेखी आमंत्रण
४०. लबाडीचा हेतू
४२. सर्वस्वाने
४३. यापेक्षा 'आज' महत्त्वाचा
४५. पालनपोषण करणारा
४७. शोभणारा
४८. मृत्यूदेवता
५०. जयश्री गडकरचा चंद्रकांत गोखले यांच्या बरोबरचा गाजलेला चित्रपट
५१. नूतन
५२. तंबाखूचा असल्यास घातक
५५. मानबिंदू (ला.)
५७. कमळ
५८. दिवस
५९. कणीदार
६०. संसारातून अंग काढून घेणे
६१. सुखाच्या मोजमापाचे धान्य
६२. दाह, मत्सर
६४. मिरवणूक
६५. पत्राचा कालबाह्य झालेला मायना
६६. नम्रतेने मान खाली घालणे
६७अ. आल्या पावली, लगेच
७०. 'राही --- दुख की चिंता क्यों सताती है' (दोस्ती)
७२. थकवा
७४. सांभाळ
७७. खाली खेचणे, पराभूत करणे
७८. अधिकाराचे स्थान
७९. त्रासलेला
८०. शर्त
८२. माराची उठलेली खूण
८३. अस्वल

### आडवे उत्तरे

१.अपराध ६.अवसानघातकी ११.दाद १२.सहनशीलता १४.धव १५.वन १६.गडवा १८.जपान २१.समोर २३.क्षण २४.हरकत २७.आब २८.डमरू २९.मजलदरमजल ३२.भान ३३.बटबटीत ३६.पलायन ३९.कलाकार ४१.मतपत्रिका ४४.वादळ ४५.पाक ४६.पसायदान ४९.कालमान ५२.माल ५३.जम ५४.मना ५६.निवारा ५८.दिवाकर ६०.वारा ६१.जनकजननी ६३.जीवन ६५.सावध ६६.नवरा ६७.किटाळ ६८.प्रस्थान ६९.जनमत ७१.तमन्ना ७३.नेपाळ ७५.नम ७६.रपाटा ७८.पवित्र ८०.अवास्तव ८२.गडकरी ८४.मंद ८५.स्तवन ८६.कळवळणे

### उभे उत्तरे

१.अदा २.पदरमोड ३.धसका ४.जनगण मन ५.हलवाहलवी ७.वध ८.सावज ९.घावन १०.तन १३.शीड १७.भाकरकाला १९.पायलट २०.कोंब २२.रमणीय २५.रद २६.तम २७.आमटी ३०.जबरदस्त ३१.जपतप ३४.बक ३५.तडक ३७.नमदा ३८.पत्रिका ४०.कावा ४२.तनमनधनाने ४३.काल ४५.पालक ४७.साजरा ४८.यम ५०.मानिनी ५१.नवा ५२.मावा ५५.नाक ५७.राजीव ५८.दिन ५९.रवाळ ६०.वानप्रस्थ ६१.जव ६२.जळजळ ६४.वरात ६५.सा न वि वि ६६.नतमस्तक ६७अ.टाकोटाक ७०.मनवा ७२.मरगळ ७४.पालन ७७.पाडणे ७८.पद ७९.त्रस्त ८०.अट ८२.वळ ८३.रीस



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त



### शुभम दुबे आणि त्याच्या पत्नीचा टीसीला चकवा

**नवी दिल्ली** –आयसीसी टी–२० विश्वचषक २०२६ च्या अंतिम सामना भारत आणि न्यूझीलंड यांच्यात खेळवण्यात आला. या सामन्यात भारताने तब्बल ९६ धावांनी विजय मिळवला. भारताने सलग दुसऱ्यांदा टी–२० विश्वचषकावर आपलं नाव कोरलं. आयसीसी टी–२० विश्वचषक लागोपाठ दुसऱ्यांदा आणि आजवर तिसऱ्यांदा जिंकणारा टीम इंडिया हा पहिला संघ ठरला. दरम्यान, अहमदाबादहून अनेक खेळाडू आपापल्या घरी रवाना झाले. यावेळी मुंबईकर शिवम दुबेही अहमदाबादहून मुंबईकडे रवाना झाला. विशेष म्हणजे वाहतूक कोंडी टाळण्यासाठी शिवम दुबे आणि त्यांची पत्नी अंजुम खान ट्रेनने प्रवास करत मुंबईत दाखल झाले. यावेळी शिवम दुबे आणि त्याची पत्नी अंजुम खानने ट्रेन प्रवासादरम्यान, तिकीट तपासण्यासाठी आलेल्या टीसीला चकवा दिल्याचे समोर आले आहे. या प्रवासादरम्यानचा एक किस्सा शिवम दुबेने सांगितला आहे.

**नेमके काय घडले?**

विमान उपलब्ध नव्हते, म्हणून शिवम दुबेने सकाळी लवकर अहमदाबादहून मुंबईला जाण्यासाठी ट्रेन पकडण्याचा निर्णय घेतला.

### विश्वविजेत्या टीम इंडियाला १३१ कोटींचे बक्षिस

मुंबई–टी२० विश्वचषक २०२६ मधील ऐतिहासिक विजयानंतर भारतीय संघावर बीसीसीआयकडून बक्षिसांचा वर्षाव करण्यात आला आहे. न्यूझीलंडचा पराभव करून सलग दुसऱ्यांदा विश्वविजेतेपद पटकावणाऱ्या सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वातील टीम इंडियासाठी १३१ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. मात्र, हा सर्व पैसा खेळाडूंच्या खिशात जाणार नसून, त्यातील एक मोठा हिस्सा सरकारी तिजोरीत म्हणजेच मइन्कम टॅक्सफच्या स्वरूपात जमा होणार आहे. चार्टर्ड अकाउंटंट अमित कुमार यांच्या विषणानुसार, खेळाडूंच्या हातात येणारी प्रत्यक्ष रक्कम बरीच कमी असेल. कराचे नियम काय सांगतात? इन्कम टॅक्स अॅक्टच्या कलम ११५बीबीनुसार, कोणत्याही बक्षीस किंवा पुरस्काराच्या रक्कमेला मइन्कम फ्रॉम अदर सोर्सेसफ मानले जाते. या उत्पन्नावर थेट ३० टक्के टॅक्स लागतो. मोठ्या रकमेमुळे यावर १० टक्के ते ३७ टक्के सरचार्ज आणि ४ टक्के आरोग्य व शिक्षण उपकर लागतो. क्रिकेटपटूंच्या उच्च उत्पन्नाचा विचार करता, कराचा एकूण दर सुमारे ३६ टक्के ते ४० टक्क्यांच्या दरम्यान असू शकतो.

### हार्दिक पांड्याविरोधात पोलीस ठाण्यात तक्रार दाखल!

**दिल्ली**–भारतीय क्रिकेट संघाने टी–२० वर्ल्डकप जिंकल्यानंतर मैदानात एकच जल्लोष केला. सलग दुसरा वर्ल्डकप जिंकल्यानंतर भारतीय खेळाडू मैदानात जोरदार सेलिब्रेशन करत होते. यावेळी काही खेळाडूंनी वेगळ्याच कारणांनी लक्ष वेधून घेतलं होतं. इशान किशन आणि हार्दिक पांड्या यांनी आपल्या प्रेयसींसोबत केलेल्या सेलिब्रेशनमुळे टीका केली जात आहे. दोघांनी भर मैदानात सर्वासमोर गर्लफ्रेंड्सना किस केल्याने भारतीय चाहते त्यांच्यावर नाराज आहेत. दरम्यान सेलिब्रेशन करताना हार्दिक पांड्याने केलेलं एक कृत्य त्याला भोवण्याची शक्यता आहे. भारतीय संघ जिंकल्यानंतर मैदानात सेलिब्रेशन करताना हातात आणि खांद्यावर तिरंगा घेऊन उभे होते. हार्दिक पांड्याही खांद्यावर तिरंगा घेऊन मैदानात डान्स करत, धावत सेलिब्रेशन करत होता. दरम्यान हार्दिक पांड्याने सेलिब्रेशन करताना तिरंग्याचा अपमान केल्याचा आरोप होत आहे. याप्रकरणी त्याच्याविरोधात पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली आहे.

# सूर्यकुमारनंतर कोण होणार टी-२० संघाचा कर्णधार?



नवी मुंबई: सूर्यकुमार यादवनंतर कोण होणार भारतीय टी–२० संघाचा कर्णधार? जाणून घ्या. भारतीय संघाने आयसीसी टी–२० वर्ल्डकप २०२६ त जेतेपदाचा मान पटकावला आहे. या स्पर्धेतील अंतिम सामना भारत आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांमध्ये पार पडला. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये पार पडलेल्या या सामन्यात भारताने ९६ धावांनी दमदार विजयाची नोंद केली. यासह भारताने तिसऱ्यांदा या स्पर्धेची ट्रॉफी उंचावली. तर मायदेशात खेळताना पहिल्यांदाच टी–२० वर्ल्डकप स्पर्धेची ट्रॉफी उंचावली. भारतीय संघ पुन्हा एकदा चॅम्पियन बनल्यानंतर, एकच चर्चा रंगली आहे, ती म्हणजे टी–२० संघाचा पुढील कर्णधार कोण होणार? दरम्यान भारताचा माजी खेळाडू मोहम्मद कैफने टी–२० संघाच्या कर्णधारपदासाठी काही पर्याय सुचवले आहेत. रोहित शर्माने टी–२० आंतराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केल्यानंतर ही जबाबदारी सूर्यकुमार यादवकडे सोपवण्यात आली होती. सूर्याने ही जबाबदारी योग्यरित्या पार पाडली. पण पुढील वर्ल्डकप स्पर्धेआधी भारतीय संघाकडून नव्या कर्णधाराची घोषणा केली जाऊ शकते. मोहम्मद कैफच्या मते, सूर्याची जागा घेण्यासाठी संजू सॅमसन योग्य पर्याय आहे.



## हा खेळाडू आहे प्रबळ दावेदार

भारतीय संघाला टी–२० वर्ल्डकप चॅम्पियन बनवण्यात संजू सॅमसनचा मोलाचा वाटा राहिला आहे. ५ सामने खेळून संजू सॅमसनने प्लेअर ऑफ द टूर्नामेंटचा पुरस्कार पटकावला. या स्पर्धेत भारतीय संघाकडून सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत तो अव्वल स्थानी राहिला. संजूला वेस्ट इंडिजविरूद्ध झालेल्या सुपर ८ फेरीतील शेवटच्या सामन्यात भारतीय संघात संधी दिली गेली होती. या सामन्यात त्याने नाबाद ९७ धावांची खेळी केली होती. त्यानंतर इंग्लंडविरूद्ध झालेल्या सेमी फायनल सामन्यात त्याने ८९ धावांची खेळी केली होती. तर अंतिम सामन्यात न्यूझीलंडविरूद्ध खेळतानाही त्याने ८९ धावांची खेळी केली होती. तसेच संजूकडे संघाचं नेतृत्व करण्याचा अनुभव देखील आहे.

स्पर्धेआधी धोनीला भेटलो तेव्हाःङ्ख, धोनीने ढ२० थउपूर्वी संघाला दिला होता मोलाचा सल्ला, सूर्याने केला मोठा खुलासा

ढ२० थउ: टी–२० वर्ल्डकप २०२८ स्पर्धा कधी अनब कुठे होणार?

वर्ल्डकप विजेता भारतीय संघ मालामाल! खउउ नंतर इउउख ने दिलं तब्बल इतक्या कोटींचं बक्षीस; आकडा पाहून चक्कर येईल

संजू सॅमसनला कर्णधार बनवण्याबाबत बोल–ताना संजू सॅमसन म्हणाला, ङ्गसॅमसनच कर्णधार बनू शकतो. मला तरी हेच वाटतं की, कर्णधारपदासाठी तोच योग्य दावेदार असतो, ज्याला जग ओळखतं. नव्या खेळाडूकडे कर्णधारपदाची जबाबदारी सोपवणं धोक्याचं ठरू शकतं.ङ्घ भारतीय टी–२० संघाच्या कर्णधारपदासाठी संजू सॅमसनसह शुबमन गिल आणि अक्षर पटेल हे प्रबळ दावेदार आहेत. पण संजू सॅमसनचा अनुभव पाहता ही जबाबदारी त्याच्याकडे सोपवली जाऊ शकते.



चीनमधील चोंगकिंग येथे डब्ल्यूटीटी चॅम्पियन्स चोंगकिंग येथे पुरुषांच्या एकेरी फेरीच्या ३२ सामन्यादरम्यान फ्रान्सच्या फ्लेव्हियन कौटिनने रिटर्न शॉट मारला.



चीनमधील चोंगकिंग येथे डब्ल्यूटीटी चॅम्पियन्स चोंगकिंग येथे महिलांच्या एकेरी फेरीच्या ३२ सामन्यादरम्यान रोमानियाची एलिझाबेटा समारा रिटर्न शॉट मारली.

# हार्दिक पंड्या निवृत्त होतोय? कधी सोडणार क्रिकेट? स्वत: घोषणा करत थेट वर्षच सांगून टाकले

**नवी दिल्ली**–भारताने टी–२० वर्ल्डकप २०२७ जिंकल्यानंतर अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर केलेल्या सेलिब्रेशनमुळे भारता–चा अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्या टीकेचा धनी ठरत आहे. प्रेयसी माहिका शर्माबरोबर मैदानात केलेली अंगलट, एकमेकांचे चुंबन घेणे, ज्या ठिकाणी पुरस्कार प्रदान सोहळा झाला तिथेच दोघांनी लोळणे यासारख्या गोष्टींमुळे हार्दिक आणि त्याची प्रेयसीवर टीका केली जात असतानाच हार्दिकने सामन्यानंतर स्वत:चा कारकिर्दीबद्दल केलेलं विधान प्रकाशझोतापासून दुरावले आहे. हार्दिकने केलेलं विधान हे त्यांच्या संभाव्य निवृत्तीच्या चर्चांना पूर्णविराम देणारे ठरले आहे.

टी–२० वर्ल्डकपवर भारताने नाव कोरल्यानंतर मैदानात अनेक भारतीय खेळाडूंच्या छोट्या छोट्या मुलाखती घेण्यात आल्या. अशाच एका मुलाख–तीत हार्दिकला निवृत्तीसंदर्भात सूचक प्रश्न विचारला. त्यावर हार्दिकने सध्या निवृत्तीचा कोणाताही विचार नसल्याचं म्हटलं आहे. त्याने अजून किती वर्ष तो क्रिकेट खेळणार आहे याबद्दलही उघडपणे भाष्य केलं आहे. विशेष म्हणजे हार्दिकने कसोटीमधून निवृत्त होऊन पाच वर्षाहून अधिक कालावधी



ओलांडला असतानाच आता त्याने मर्यादित षटकांच्या दोन्ही प्रकारच्या क्रिकेटमधून लवकर निवृत्त होणार नसल्याचे स्पष्टच सांगितले आहे. अजून किती वर्ष खेळणार क्रिकेट? निवृत्तीच्या प्रश्नाला उत्तर देताना हार्दिक पंड्याने, ''माझ्याकडे अजून १० वर्ष खेळू शकतो इतके क्रिकेट शिल्लक आहे. मला या १० वर्षात १० हून अधिक आयसीसी ट्रॉफी जिंकायच्या आहेत. हेच माझे ध्येय आहे,'' असं स्पष्टपणे सांगितलं आहे. ३२ वर्षीय हार्दिक पांड्याने, ''मी ४२ वर्षाचा होईपर्यंत खेळू शकतो. सध्या मी क्रिकेट सोडण्याबद्दल विचारही करत नाहीये,'' असं स्पष्टपणे सांगितलं आहे. एवढ्यावरच न थांबता हार्दिकने, ''मी सीनियर खेळाडू म्हणून ओळखला जातो, पण माझे अर्धेच करिअर पूर्ण झाले असून बरंच क्रिकेट शिल्लक आहे,'' असेही ठामपणे सांगितले आहे. म्हणजेच हार्दिकने निवृत्तीसंदर्भातील सर्व शक्यता फेटाळून लावल्या असून पुढील १० वर्षामध्ये जास्तीत जास्त स्पर्धा खेळण्याचा हार्दिकचा मानस आहे. म्हणजेच हार्दिकला अजून ५ टी–२० वर्ल्डकप तरी खेळायचे आहेत.

मुंबई इंडियन्सचे करणार नेतृत्व

पुढील काही आठवड्यांमध्ये हार्दिक इंडियन प्रिमिअर लीगच्या १९ व्या म्हणजेच २०२६ च्या पर्वात मुंबई इंडियन्सचे नेतृत्व करताना दिसणार आहे. हार्दिकच्या नेतृत्वाखालील हे मुंबईचे तिसरे वर्ष असणार आहे. तो यंदा तरी संघाला चषक मिळवून देतो का हे पाहणे मुंबईच्या चाहत्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरणार आहे.

# वर्ल्ड कपमधील फ्लॉप परफॉर्मन्समुळे सूर्यकुमार यादवला झालं नुकसान





दिल्ली–आयसीसी टी२० वर्ल्ड कप २०२६ नंतर आता आंतरराष्ट्रीय क्रिकेट काउन्सिलने टी२० रँकिंग जाहीर केली आहे. वर्ल्ड कपमध्ये दमदार पेर्फोर्मन्स करून प्लेअर ऑफ द सीरिज ठरलेल्या संजू सॅमसनने मोठी उडी घेतली असून याशिवाय ईशान किशनला सुद्धा मोठा फायदा झालाय. तर वर्ल्ड कप स्पर्धेत कॅप्टन सूर्यकुमार यादवची बॅट शांतच राहिली ज्यामुळे आयसीसी रँकिंगमध्ये त्याची घसरण झाली आहे. तर तिलक वर्माला सुद्धा फ्लॉप परफॉर्मन्सचा फटका बसलाय.

संजू सॅमसनला मोठा फायदा : टी२० वर्ल्ड कपमध्ये संजू सॅमसनने ५ सामन्यात जवळपास ३२१ धावा केल्या ज्यासाठी त्याला प्लेअर ऑफ द टूर्नामेंट अवॉर्ड सुद्धा मिळाला. या दमदार परफॉर्मन्सचा फायदा संजू सॅमसनला झाला आणि तो थेट ४० व्या स्थानावरून २२ व्या स्थानावर पोहोचला आहे. संजू सॅमसनची रेटिंग ही ६३७ एवढी आहे. संजू सॅमसन स्पर्धेत सर्वात जास्त धावा करणारा तिसरा फलंदाज होता. संजूने शेवटच्या सलग तीन सामन्यात अर्धशतक ठोकलं. ईशान आणि अभिषेक पोहोचले टॉपवर : ईशान किशनला दोन जागांचा फायदा झाला असून तो आता आयसीसी टी२० फलंदाजांच्या रँकिंगमध्ये दुसऱ्या स्थानावर पोहोचला. ईशान किशनची रेटिंग ही ८७१ ची झाली आहे. ईशान किशन टी२० वर्ल्ड कपमध्ये सर्वात जास्त धावा करणारा चौथा फलंदाज आहे. नऊ सामन्यांमध्ये नऊ डावात फलंदाजी करताना, त्याने ३५.२२ च्या सरासरीने आणि १९३.२९ च्या स्ट्राईक रेटने ३१७ धावा केल्या, ज्यामध्ये ३ अर्धशतकांचा समावेश आहे. भारतीय ओपनर अभिषेक शर्मा अव्वल स्थानावर आहे.

सूर्यकुमार यादव आणि तिलक वर्माला झालं नुकसान : आयसीसी रँकिंगमध्ये सूर्यकुमार यादवचं नुकसान झालं आहे. सूर्यकुमार आता ९ व्या स्थानावर पोहोचला असून त्याची रेटिंग ही ७२२ आहे. टी२० वर्ल्ड कपमध्ये ९ सामन्यात सूर्यकुमार यादवने ३०.२५ च्या सरासरीने १३६.७२ च्या स्ट्राइक रेटने २४२ धावा केल्या. यादरम्यान त्याच्या बॅटमधून फक्त १ अर्धशतक आलं.

आयसीसी रँकिंगमधील टॉप ५ फलंदाज : आयसीसी रँकिंगमधील टॉप ५ वर नजर टाकली तर अभिषेक शर्मा नंबर १ तर ईशान किशन हा नंबर दोनवर आहे. तर पाकिस्तानचा साहिबजादा फरहान ८४८ रेटिंग सह तिसऱ्या स्थानी आहे. इंग्लंडचा फलंदाज फिल सॉल्ट ७९२ रेटिंग सह चौथ्या स्थानी आहे. श्रीलंकेचा पथुम निसंका हा पाचव्या स्थानावर असून त्याची रेटिंग ७६६ एवढी आहे.

# टीम इंडियाला लाज वाटली पाहिजे म्हणणाऱ्या कीर्ति आझाद यांनी १९८३ वर्ल्डकपमध्ये

दिल्ली–भारताचे माजी क्रिकेटपटू कीर्ति आझाद हे भारतीय संघाने टी–२० वर्ल्डकप २०२६ जिंकल्यानंतर चर्चेत आहेत. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर रविवारी रात्री भारतीय संघाने न्यूझीलंडला ९६ धावांनी पराभूत करत सलग दुसऱ्यांदा टी–२० वर्ल्डकप जिंकण्याचा यापूर्वी कोणत्याही संघाला न जमलेला पराक्रम केला. आयसीसीचे अध्यक्ष जय शाह यांच्या हातून कॅप्टन सूर्यकुमार यादवने वर्ल्डकपचा चषक स्वीकारला. मात्र या सोहळ्यानंतर एकीकडे भारतीय खेळाडू मैदानामध्ये आनंद साजरा करत असतानाच अचानक जय शाह कॅप्टन सूर्यकुमार आणि मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरला घेऊन शहरातील एका हनुमान मंदिरात देव दर्शनासाठी पोहोचले. हे तिघेही वर्ल्डकपची ट्रॉफी घेऊन मंदिरात गेले होते. याच विषयावरुन कीर्ति आझाद यांनी आक्षेप घेतला असून खेळाला धार्मिक रंग देणाऱ्या टीम इंडियाला लाज वाटली पाहिजे असं म्हटलं आहे. स्वत: १९८३ च्या वर्ल्डकपमध्ये कपिल देव यांच्या विजयी संघाला भाग असल्याचं म्हणत कीर्ति आझाद यांनी ही टीका केली आहे. मात्र त्यांनी खरोखरच भारताच्या पहिल्या वर्ल्डकप विजयामध्ये किती योगदान दिलं होतं हे पाहून तुम्हाला आश्चर्य नक्कीच वाटेल.

कीर्ति आझाद यांचे नेमके शब्द काय?

१९८३ मध्ये आम्ही जिंकलो तेव्हा ट्रॉफी आपल्या विविधतेने नटलेल्या मायभूमीत (म्हणजेच भारतात) आणली होती. ट्रॉफी हा केवळ एका धर्माचा विजय नसून तो १४० कोटी भारतीयांचा आहे. ट्रॉफी मंदिरातच का नेली? मशिदीत, चर्चमध्ये किंवा गुरुद्वारात का नाही नेली? असा थेट सवाल कीर्ति आझाद यांनी विचारला आहे. एवढ्यावरच न थांबता त्यांनी, ''खेळाडूंनी आणि प्रशासनाने खेळ आणि धर्म वेगळे ठेवावेत,'' असं मतही नोंदवलं आहे. त्यांच्या मतावरुन दोन गट पडले असून काही त्यांना समर्थन देत आहेत तर काहींनी विरोध केला असून नको तो वाद उकरुन काढू नये असे म्हटले आहे. असे असले तरी आता कीर्ति आझाद यांनी खरोखरच १९८३ च्या



वर्ल्डकपमध्ये भारताच्या विजयामध्ये नेमके काय आणि किती योगदान दिले होते? याची चर्चाही सुरु झाली आहे. याच प्रश्नाचे उत्तर आपण जाणून घेणार आहोत.

किर्ती आझाद यांनी कोणती भूमिका बजावली?

कीर्ति आझाद हे कपील देव यांच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाचे सदस्य होते ज्याने १९८३ मध्ये क्रिकेट वर्ल्ड कप मध्ये विजय मिळवला होता. खरं तर कीर्ति आझाद यांनी या स्पर्धेत खूप कमी वेळा फलंदाजी केली. कीर्ति आझाद यांनी मुख्यत: ऑफ–स्पिनर म्हणून भारतीय संघाच्या विजयात योगदान दिलं. करून योगदान दिले.

१९८३ च्या वर्ल्डकपमध्ये कीर्ति आझाद यांना दोन डावांमध्ये भोपळाही फोडता आला नव्हता. त्यांना सेमीफायनल आणि फायनलमध्ये संघात स्थान देण्यात आलेलं. इंग्लंडविरुद्धच्या सेमीफायनलमध्ये त्यांनी फलंदाजी केली नाही. तर वेस्ट इंडिजविरुद्धच्या फायलनमध्ये ते शून्य धावांवर बाद झाले होते. अँडी रॉबर्सने त्यांना बाद केलं होतं.

गोलंदाजीमध्ये चमकले

कीर्ति आझाद यांनी गोलंदाजीमध्ये उत्तम योगदान दिलं होतं. त्यावेळेच्या नियमाप्रमाणे प्रत्येक गोलंदाजाला १२ ओव्हर टाकण्याची मूभा होती. सेमीफायनलमध्ये या १२ ओव्हरमध्ये त्यांनी एक विकेट घेतली. एक निर्धाव ओव्हर टाकताना त्यांनी अवघ्या २८ दिल्या होत्या. त्यांनी इयन बॉथम यांना बाद केलं होतं. त्यावेळी इयन हे फार धोकादायक फलंदाज मानले जायचे.

फायनलमध्ये कीर्ति आझाद यांनी केवळ ३ ओव्हर गोलंदाजी केली. त्यामध्ये त्यांनी अवघ्या सात धावा दिल्या. त्यांचा इकनॉमी रेट २.४७ इतका होता. तीन सामन्यांचा विचार केल्यास हा सर्वोत्तम इकनॉमी रेट्सपैकी एक ठरलेला.

फायलनचा स्कोअर काय होता?

फायनलच्या सामन्यात भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करत १८३ धावा केल्या होत्या. १८४ धावाचा पाठलाग करताना वेस्ट इंडिजचा संघ १४० धावांपर्यतच मजल मारु शकला. भारताने त्यावेळेचा दादा संघ असलेल्या वेस्ट इंडिजच्या संपूर्ण टीमला तंबूत पाठवत सामना ४३ धावांनी जिंकला होता. या सामन्यामध्ये मोहिंदर अमरनाथ यांना मॅन ऑफ द मॅच पुरस्कार देण्यात आला होता. त्यांनी २६ धावा केलेल्या आणि ३ विकेट्सही घेतलेल्या.

# मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात आंतरराष्ट्रीय महिला दिन उत्साहात साजरा



**सोलापूर/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात दिनांक ११ मार्च २०२६ रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिन मोठ्या उत्साहात आणि अभिमानाने साजरा करण्यात आला. विभागातील महिला कर्मचाऱ्यांच्या मौल्यवान योगदानाची ओळख पटविण्यासाठी आणि त्यांचे कौतुक करण्यासाठी सोलापूर येथे एक विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

सोलापूर विभागातील अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक (एडीआरएम) श्री अंशुमाली कुमार यांनी प्रमुख पाहुणे म्हणून या कार्यक्रमाची शोभा वाढवली. त्यांनी आपल्या भाषणात रेल्वेमधील महिला कर्मचाऱ्यांच्या उल्लेखनीय योगदानाचे कौतुक केले आणि भारतीय रेल्वेसह विविध क्षेत्रात महिलांचा वाढता सहभाग आणि कामगिरी यावर प्रकाश टाकला. त्यांनी अधोरेखित केले की महिला कर्मचारी त्यांच्या समर्पण आणि व्यावसायिकतेमुळे संस्थेला बळकटी देण्यात अधिकाधिक महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

या कार्यक्रमात सोलापूर जिल्ह्याच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधीक्षक श्रीमती भाग्यश्री जाधव यांचे प्रमुख व्याख्यान होते. त्या विशेष पाहुण्या आणि प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या. ''महिला सक्षमीकरण'' या विषयावर बोलताना त्यांनी महिला सक्षमीकरण, समाजातील त्यांची महत्त्वाची भूमिका आणि कामाच्या ठिकाणी त्यांची वाढती उपस्थिती आणि नेतृत्व याबद्दल मौल्यवान मार्गदर्शन केले.

या प्रसंगाचे स्मरण करण्यासाठी, विभागभर अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक ७ मार्च २०२६ रोजी क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या आणि कार्यक्रमादरम्यान विजेत्यांना रोख पारितोषिके देऊन गौरवण्यात आले. दिनांक ११ मार्च २०२६ रोजी झालेल्या नृत्य स्पर्धेतील विजेत्यांना रोख पारितोषिकेही देण्यात आली, ज्यामुळे कार्यक्रमात उत्साह आणि आनंद वाढला. याप्रसंगी, ''सशक्त नारी पुरस्कार'' साठी विभागीय स्तरावर निवड झालेल्या सोलापूर विभागातील तीन महिला कर्मचाऱ्यांना त्यांच्या अनुकरणीय कामगिरी आणि समर्पणाबद्दल पदके आणि प्रशंसा प्रमाणपत्रे देऊन सन्मानित करण्यात आले. कौतुक आणि प्रोत्साहन म्हणून, सोलापूर विभागातील सर्व महिला कर्मचाऱ्यांना भेटवस्तूंचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला मध्य रेल्वे महिला कल्याण संघटना, सोलापूर विभागाच्या अध्यक्षा श्रीमती निभा कुमारी यांच्यासह संघटनेच्या इतर पदाधिकारी आणि सदस्या उपस्थित होत्या. या कार्यक्रमास विविध विभागांतील शाखा अधिकारी, अधिकारी व कर्मचारी, मान्यताप्राप्त संघटना व संघटनांचे प्रतिनिधी तसेच विभागातील महिला कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा कार्यक्रम कर्मचारी लाभ निधी समितीने आयोजित केला होता. सोलापूर विभागातील इतर विभागांच्या सक्रिय समन्वयाने आणि पाठिंब्याने, आंतरराष्ट्रीय महिला दिन २०२६ मोठ्या उत्साहात साजरा झाला.

## नितीन नाईक यांचे अकाली निधन



**लातूर/प्रतिनिधी :** लातुर येथील किराणा दुकानदार महेश पुदाले यांचे मेव्हणे व घाटनांदुर ता आंबाजोगाई चे विरशैव तेली समाजाचा युवक नितीन मधुकर नाईक यांचे लातुर येथील रुग्नालयात वयाच्या ४३व्या वर्षी अल्पशा आजाराने बुधवार दि ११/३/२६ रोजी सकाळी ९:३०वा. निधन झाले.

त्यांच्या पच्छात आई वडील एक बहीन पत्नी एकमुलगा एकमुलगी असा परिवार आसुन त्यांच्या पार्थीवावर घाटनांदुर येथील तेली समाजाच्या बेलपत्रीत दुपारी २:४५वा. अत्यसंस्कार करण्यात आला.सौ.वर्षा महेश पुदाले यांचे जेष्ठ भाऊ होते. अंत्य यात्रेत लातुर येथिल चौदाघर मठ परिसरातील असंख्य मित्रपरिवार,महीला मंडळ सदश्या मोठ्या संखेने उपस्थित होत्या नितीन याच्या अकाली निधनाने हळ हळ व्याक्त केली जात होती.

## माजी मंत्री सहकार महर्षी श्री दिलीपराव देशमुख साहेब यांचा मांजरा कारखाना संचालक मंडळाच्यावतीने सत्कार

### मांजरा साखर कारखान्याचा चालू गळीत हंगामात लातूर जिल्ह्यात सर्वाधिक साखर उतारा



**लातूर/प्रतिनिधी :** मांजरा साखर कारखान्याचा चालू गळीत हंगाम २०२५-२६ दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ पासून सुरू झाला असून ७ मार्च २०२६ अखेर बंद झाला आहे , या कालावधीत कारखान्याने ऊस गळीत, साखर उत्पादन , इथेनॉल उत्पादन व वीज निर्मितीमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. चालू गळीत हंगामात कारखान्याच्या कार्यक्षेत्रात सभासद व बिगर सभासदांचा मिळून एकूण १९,३६१.३३ हेक्टर क्षेत्रात ऊस उपलब्ध होता.

या हंगाम कालावधीत ७,१५,४०९.४३५ मेट्रिक टन ऊसाचे गाळप करण्यात आले असून त्यातून ५,८८,५४० क्विंटल साखरेचे उत्पादन झाले आहे. या हंगामात बी-हेवी व सिरपसह सरासरी साखर उतारा १२.३० टक्के इतका मिळाला असून, लातूर जिल्ह्यातील साखर कारखान्यांमध्ये मांजरा साखर कारखान्याचा सध्या तरी सर्वाधिक उतारा मिळाला आहे. सदरचा उतारा व्हीएसआय यांच्याकडून प्रमाणित करून घ्यावयाचा आहे. जिल्ह्यातील काही कारखाने अजून सुरू आहेत.

कारखान्याच्या को-जनरेशन (वीज निर्मिती) प्रकल्पाने देखील चांगली कामगिरी केली आहे. ७ मार्च २०२६ अखेर या प्रकल्पातून ४,८८,११,००० केडब्ल्यूएच (युनिट्स) वीज उत्पादन झाले. त्यापैकी २,२६,०१,९५० केडब्ल्यूएच वीज कारखान्याने स्वतः वापरली, तर २,६२,०९,०५० केडब्ल्यूएच वीज महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला पुरवठा करण्यात आली.

तसेच कारखान्याच्या सोलार प्रकल्पातून ७ मार्च २०२६ अखेर ४,३५,६०६ केडब्ल्यूएच वीज निर्मिती झाली असून ती पूर्णपणे कारखान्याच्या वापरासाठी उपयोगात आणण्यात आली आहे. दरम्यान, अर्कशाळा (डिस्टिलरी) प्रकल्पात २२ नोव्हेंबर २०२५ पासून उत्पादन सुरू झाले असून ७ मार्च २०२६ अखेर १,२७,७९,७४१ लिटर इथेनॉल उत्पादन झाले आहे. त्यापैकी ७८,४५,००० लिटर इथेनॉल विक्री करण्यात आलेली आहे.

मांजरा साखर कारखान्याने चालू गळीत हंगामात लातूर जिल्ह्यात सर्वाधिक साखर उतारा मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. हे यश कारखान्याचे चेअरमन तथा मांजरा परिवाराचे मार्गदर्शक सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे शक्य झाल्याची भावना व्यक्त करण्यात आली. या यशाबद्दल कारखान्याच्या संचालक मंडळाच्या वतीने त्यांचे अभिनंदन व आभार व्यक्त करण्यात आले.यावेळी व्हा चेअरमन अशोकराव काळे, शेती कमिटी अध्यक्ष कैलास पाटील,मदन भिसे, नवनाथ काळे,वसंत उफाडे, धनराज दाताळ,तात्यासाहेब देशमुख,भैरू कदम, सदाशिव कदम,निळकंठ बचाटे,दयानंद बिडवे, विलास चामले, अरुण कापरे,शंकरराव बोळंगे,अनिल दरकसे, बालासाहेब पांढरे, श्रीकृष्ण काळे,सुरेश चव्हाण, शत्रूघ्न पाटील, तानाजी जाधव, कार्यकारी संचालक पंडित देसाई,खाते प्रमुख,अधिकारी,कर्मचारी आदींची उपस्थिती होती.

## दोन दशकापासून बंद असलेला नळेगावचा 'जय जवान जय किसान' साखर कारखाना सुरू करा

### शेतकरी शिष्टमंडळाचे आमदार अभिमन्यू पवार यांना निवेदन



**औसा/प्रतिनिधी :** नळेगाव (ता. चाकूर) नळेगाव येथे असलेला 'जय जवान जय किसान सहकारी साखर कारखाना' गेल्या सुमारे दोन दशकापासून बंद अवस्थेत असून तो तात्काळ सुरू करण्यात यावा, या मागणीसाठी शेतकरी शिष्टमंडळाच्या वतीने ११ मार्च रोजी आमदार अभिमन्यू पवार यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले.

नळेगाव (ता. चाकूर) येथे असलेला हा सहकारी साखर कारखाना अहमदपूर, चाकूर, शिरूर अनंतपाळ आणि उदगीर या परिसराच्या मध्यभागी असून या संपूर्ण भागातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. या कारखान्याचे दहा हजारांहून अधिक सभासद असून हजारो शेतकरी व कामगारांचे जीवन या कारखान्यावर अवलंबून आहे. मात्र मागील अनेक वर्षांपासून कारखाना बंद असल्यामुळे या भागातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

कारखाना परिसराच्या चारही बाजूंनी पाण्याचे स्त्रोत उपलब्ध असल्यामुळे या भागात मोठ्या प्रमाणात ऊस उत्पादन घेतले जाते. लाखो टन ऊस उपलब्ध असतानाही साखर कारखाना बंद असल्यामुळे शेतकऱ्यांना ऊस दूरवरच्या कारखान्यांकडे पाठवावा लागत आहे. त्यामुळे वाहतूक खर्च वाढत असून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस तसेच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा कारखाना पुन्हा सुरू करण्याबाबत सकारात्मक भूमिका घेत शब्द दिला असल्याचे शेतकरी प्रतिनिधींनी सांगितले. त्या अनुषंगाने शासनस्तरावर तात्काळ पाठपुरावा करून कारखाना सुरू करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी चंद्रशेखर तांदळे, तुकाराम पारवे, सूर्यकांत चव्हाण, मदन गायकवाड, दयानंद काळे, शिवाजी पाटील, कमलाकर सूर्यवंशी, रामकिसन कातपुरे, तुकाराम नरवाडे, श्रीमंत शेळके यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी सभासद उपस्थित होते.

## मुरुड येथे नगरपरिषदेसह एमआयडीसी लवकरच मंजूर करून घेणार-आ.कराड




**लातूर/प्रतिनिधी :** सर्वांगीण विकासासाठी राज्यातील महायुती शासनाच्या माध्यमातून मुरुड शहराला नगरपरिषदेचा दर्जा आणि विविध उद्योजक व सुशिक्षित बेरोजगारासाठी एमआयडीसी कार्यान्वित व्हावी यासाठी शासन स्तरावर कारवाई सुरू असून लवकरच मंजूरी मिळणार असल्याची माहिती भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी दिली.

नुकत्याच जाहीर झालेल्या राज्याच्या अर्थसंकल्पात मुरुड ते पाडोळी या रस्त्यावर मुरुड गावातून सिमेंट काँक्रेट रस्ता आणि नाली बांधकामासाठी तब्बल सहा कोटी रुपयांचा निधी मिळवून दिल्याबद्दल भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांचा लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात यथोचित सत्कार करून मुरुड येथील भाजपा कार्यकर्त्यांनी आभार व्यक्त केले. यावेळी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, युवा मोर्चाचे राजकिरण साठे, मुरुड येथील सरपंच श्रीमती अमृताताई नाडे, भाजपाचे ग्रामपंचायत सदस्य महेश कणसे, सौ. लताताई भोसले, सुरज सूर्यवंशी, तात्या ईटकर यांच्यासह इतर अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, मुरुड शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता मुरुड शहराला नगरपरिषदेचा दर्जा देण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरू असून विविध लहान-मोठ्या उद्योजकासाठी आणि सुशिक्षित बेरोजगाराकरिता मुरुड येथे एमआयडीसी कार्यान्वित व्हावी यासाठी आपण प्रयत्नशील आहोत लवकरच मुरुडला नगर परिषदेच्या दर्जा मिळेल आणि एमआयडीसी मंजूर होईल अशी माहिती त्यांनी दिली.

मुरुड येथील शासकीय विश्रामगृह जीर्ण अवस्थेत झाले असून नवीन सुसज्ज विश्रामगृह मंजूर व्हावे यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचे सांगून आ. रमेशअप्पा कराड यांनी विविध सामाजिक सभागृह, स्मशानभूमी यासह मुरुड शहराच्या विविध विकास कामांना येत्या काळात मान्यता मिळेल अशीही माहिती दिली. यावेळी मुरुड येथील नागरिकांशी संवाद साधून विविध विकासात्मक विषयावर आ. कराड यांनी सविस्तर चर्चा केली.

याप्रसंगी मुरुड येथील शुभम देवकर, बळी हिंगले, वैजनाथ हराळे, शब्बीर सय्यद, रवी ईटकर, मनोज धोत्रे, अक्षय भोसले, बापू दिवार, आकाश सापसोड, दत्ता कांबळे, कुणाल चव्हाण, दत्ता पुदाले, सुयश शिंदे, ऋषिकेश शिंदे, क्षणमती कोंडेकर, चंद्रकांत धिवार यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## दयानंद विज्ञानमध्ये शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी कार्यशाळा

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.०६ मार्च २०२६ रोजी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी समुपदेशन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते.याप्रसंगी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे, प्रमुख पाहुणे वैशाली चापसी, पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे, पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरुडकर, कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव, बन्सी कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी साधन व्यक्ती वैशाली चापसी यांनी समुपदेशन कार्यशाळेत शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना व्यावसायिक पोशाख , महाविद्यालयाची शिस्त, योग्य मर्यादांचे पालन, चुकांची जबाबदारी स्वीकारणे,चूका टाळणे,वेळेचे पालन व वेळेचे व्यवस्थापन करणे आणि विद्यार्थ्यांशी व वरिष्ठांशी योग्य वर्तणूक करणे अशा विविधांगी विषयांवर मार्गदर्शन केले.याचबरोबर त्यांनी संघ भावना व सहकार्य तसेच ध्यानधारणाविषयीही माहिती दिली.

## लिंगायत समाजाचे तुळजापूर येथे २२ मार्च रोजी राज्यव्यापी अधिवेशन

### जीवनगौरव, समाजभुषण व अक्कमहादेवी पुरस्काराचेही वितरण

**लातूर/प्रतिनिधी :** लिंगायत महासंघ, शाखा धाराशिव जिल्ह्याच्यावतीने रविवार दि.२२ मार्च २०२६ रोजी त्रीमुर्ती मंगल कार्यालय, तुळजापूर येथे लिंगायत महासंघाचे प्रांताध्यक्ष प्रा.सुदर्शनराव बिरादार यांच्या नेतृत्वाखाली लिंगायत समाजाचे राज्यव्यापी अधिवेशन आयोजित करण्यात आल्याचे लिंगायत महासंघाचे प्रदेश सरचिटणीस चंद्रकांत कालापाटील व लिंगायत महासंघाचे धाराशिव जिल्हाध्यक्ष शंकरराव पाटील गुंजोटीकर यांनी सांगितले. २२ मार्च २०२६ रोजी होणाऱ्या अधिवेशनात एकूण ९ सत्र ठेवण्यात आले आहेत.

महात्मा बसवेश्वरांच्या तत्वांची माहिती वचन, कायक, दासोह, अनुभवमंटप, आष्टावरण व इष्टलिंग यावर अनेक मान्यवर वक्ते मार्गदर्शन व प्रात्यक्षीके सादर करणार आहेत. याबरोबरच अक्कामहादेवी, चन्नबसवेश्वर, सिध्दरामेश्वर यांच्या जीवन चरित्रावर सविस्तर मार्गदर्शन होणार आहे.

या अधिवेशनाचे पहिले सत्र सकाळी ६.३० वाजता ५०० दाम्पत्यांच्या सामुहिक सहभागाने इष्टलिंग पुजा होणार असुन या पुजेला वैज्ञानिक दृष्टीकोनातून मार्गदर्शन करण्यासाठी डॉ.अमरनाथ सोलपूरे - बिदर, डॉ.मन्मथ गताटे - निलंगा व अमृताताई बचाटे - तुळजापूर हे उपस्थित राहणार आहेत. तर दुसऱ्या वचनोत्सव सत्रात संगमेश्वर तवरखेडे बसवकल्याण हे मार्गदर्शन करणार आहेत. तिसऱ्या सत्रात अक्कमहादेवीच्या चरित्रावर यशवंत गणेशकर सास्तुर हे मार्गदर्शन करणार आहेत.

चौथ्या सत्रात सिध्दरामेश्वराच्या जीवन चरित्रावर सोलापूर येथील वक्ते श्री चन्नवीर भद्रेश्वर मठ हे मार्गदर्शन करणार आहेत. तर पाचव्या सत्रात चन्नबसवेश्वराच्या जीवनचरित्रावर नांदेड येथील वक्ते प्रा.आनंद कर्णे हे मार्गदर्शन करणार आहेत. या सत्राचे उद्घाटन प्रा.प्रभाकर उदगीरे हे करणार आहेत. तर सहाव्या सत्रात आष्टावरण या विषयावर मल्लिकार्जुन मुलगे सोलापूर हे मार्गदर्शन करणार आहेत.

सातव्या सत्रात महात्मा बसवेश्वरांचे तत्व व मंगळवेढा येथील त्यांचे वास्तव्य या विषयावर महात्मा बसवेश्वर महाविद्यालय लातूरचे माजी प्राचार्य डॉ.सोमनाथ रोडे हे मार्गदर्शन करणार आहेत. तर आठव्या सत्रात जाहीर महासभा होणार असुन या कार्यक्रमाचे उद्घाटन तुळजापूरचे आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या हस्ते होणार आहे.

या सभेत जीवनगौरव, समाजभुषण व अक्कमहादेवी पुरस्कार देवून अनेक मान्यवरांचा गौरव करण्यात येणार आहे. तसेच धाराशिव, लातूर व सोलापूर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीत निवडून आलेले नगराध्यक्ष, उपमहापौर, नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमासाठी धाराशिव जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींना आमंत्रीत करण्यात आले आहे. तरी लातूर जिल्ह्यातील समाजबांधवांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन लिंगायत महासंघाचे प्रदेश सरचिटणीस चंद्रकांत कालापाटील व धाराशिव लिंगायत महासंघाचे जिल्हाध्यक्ष शंकरराव पाटील गुंजोटीकर व लिंगायत महासंघाचे लातूर जिल्हाध्यक्ष करीबसवेश्वर पाटील यांनी केले आहे.

## जयभीमनगर येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती अध्यक्षपदी शंकर गायकवाड




**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरातील जयभीमनगर येथील महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती अध्यक्षपदी शंकर गायकवाड, उपाध्यक्षपदी अजय जोगेश्वरी तर सचिवपदी सारनाथ सोनकांबळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

जयभिम नगर येथील मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत सदरची कार्यकारिणी निवडण्यात आली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती विविध कार्यक्रम आणि उपक्रम घेऊन मोठ्या उत्साहात साजरी करण्याचे यावेळी ठरले.

उर्वरित कार्यकारिणी पुढील प्रमाणे आहे. जयंती मंडळाच्या कोषाध्यक्षपदी निलेश गायकवाड, सहसचिव चेतन वाघमारे सहकोषाध्यक्ष आकाश ढगे सल्लागार संग्राम वाघमारे, सचिन फुले, अविनाश सूर्यवंशी, मार्गदर्शक अविनाश बर्गे भैया, विशाल भाऊ गवळी अभिमन्यू तात्या लामतुरे, मारुती चक्रे, किशोर कांबळे यांची निवड करण्यात आली. यावेळी तनुजा कांबळे, अनिल क्षिरसागर, राहुल बनसोडे, सुहास सोनकांबळे लखन पात्रे, विलास सातपुते बाबासाहेब थोरात दिलीप सातपुते आदींची उपस्थिती होती.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतन देयकांसाठी आता नवीन सेवार्थ प्रणाली

## – जिल्ह्यातील आहरण व संवितरण अधिकारी यांना प्रशिक्षण – पेपरलेस पद्धतीने सादर होणार वेतन देयके

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील शासकीय, निमशासकीय कार्यालये, आस्थापनातील अधिकारी, कर्मचाऱ्यांची वेतन देयकासाठी ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी नवीन सेवार्थ प्रणाली विकसित करण्यात आली आहे.

यामध्ये पेपरलेस पद्धतीने केवळ ऑनलाईन वेतन देयके दाखल करावी लागणार असून वेतन देयक प्रक्रिया अधिक सुलभ, जलद व पारदर्शक होणार आहे. या प्रणालीच्या वापराबाबत माहिती देण्यासाठी लातूर जिल्हा कोषागार कार्यालयामार्फत १० मार्च २०२६ रोजी दोन सत्रात जिल्ह्यातील सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.





जुने जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीतील जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित या प्रशिक्षणाला लातूर जिल्हा कोषागार अधिकारी कार्यालयातर्फे अधिनस्त असलेल्या आहरण व संवितरण अधिकारी, लेखा विषयक काम पाहणारे कर्मचारी यांना जुन्या सेवार्थ प्रणालीतून नवीन सेवार्थ प्रणालीत डाटा ट्रान्स्फर करण्यापूर्वी माहिती अद्ययावत करणे, पदांची पडताळणी, नवीन सेवार्थ प्रणालीमधील माहितीची पडताळणी याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. तालुकास्तरीय अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी सकाळच्या सत्रात झालेल्या प्रशिक्षणाला अहमदपूरच्या उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे यांची प्रमुख उपस्थिती होती. दुपारच्या सत्रात जिल्हास्तरीय अधिकारी, कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात आले. जिल्हा कोषागार अधिकारी डॉ. उज्वला पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी अपर कोषागार अधिकारी मा. रो. गुटे, ख. नै. खोजे, ना. ए. बुध्दिवंत यांच्यासह जिल्ह्यातील आहरण व संवितरण अधिकारी तसेच कर्मचारी उपस्थित होते.

**मास्टर ट्रेनर्स यांनी केले मार्गदर्शन**

नवीन सेवार्थ प्रणालीमुळे वेतन देयकाची मुद्रित प्रत कोषागारात सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही. वेतन देयके ई–स्वरुपात पाठविण्यात येणार असून सदर देयके आधार बेस ओटीपीद्वारे ई–हस्ताक्षर करुन करण्यात येणार आहेत. यामुळे वेतन देयक प्रक्रिया अधिक सुलभ, जलद व पारदर्शक होणार आहे. नवीन सेवार्थ प्रणालीसंदर्भातील सविस्तर प्रशिक्षण मास्टर ट्रेनर्स उपकोषागर अधिकारी (सं) आर. डी. माने, तांत्रिक सहाय्यक शिवलिंग उटगे यांनी दिले. यावेळी पीपीटीद्वारे नवीन सेवार्थ प्रणाली वापराचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. जिल्ह्यातील आहरण व संवितरण अधिकारी, कर्मचारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेजचे आंतरराष्ट्रीय परिषदेत लौकिकास्पद यश

**लातूर/प्रतिनिधी :** चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज (डिग्री), लातूर येथील एम. फार्म (फार्माकोलॉजी) द्वितीय वर्षाचा विद्यार्थी ऋषिकेश चौधरी याने इनोव्हेशन्स इन फार्मास्युटिकल, लाइफ अँड फॉरेन्सिक सायन्सेस: ब्रिजिंग क्लासिकल नॉलेज विथ मॉडर्न टेकनॉलॉजिजया दुसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेत ओरल प्रेझेंटेशन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले आहे.

ही परिषद दत्तकला कॉलेज ऑफ फार्मसी आणि दत्तकला इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्स अँड रिसर्च, भिगवण, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत उत्कृष्ट सादरीकरणासाठी ऋषिकेश चौधरीला रु. ३०००/– रोख पारितोषिक, ट्रॉफी आणि प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेला आणि संशोधनपर उपक्रमांना नवे बळ मिळाले असून विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या यशाबद्दल संस्थेचे सचिव श्री. भीमाशंकर देवणीकर, विश्वस्त श्री. विजयकुमार मठपती, श्री. अरुण हालकुडे, प्राचार्य डॉ. विजयेंद्र स्वामी, डॉ. अविनाश टेकाडे, डॉ. ओमप्रकाश भुसनुरे, डॉ. अनंत देशपांडे, डॉ. शिवराज नागोबा, डॉ. विवेक पंचभाई, डॉ. पद्मजा गिराम, डॉ. राम साखरे, डॉ. सुनील हिंडोळे, डॉ. शिवकुमार लद्दे, डॉ. नशीर शेख, प्रा. सारिका झिंगाडे, प्रा. रिशा वाले, प्रा. मोईन अत्तार, प्रा. महेश मानके, प्रा. अविनाश मठपती, प्रा. अमोल नारागुडे, प्रा. विजयानंदा खडकुदकर, प्रा. जयश्री स्वामी, प्रा. भीमाशंकर हुच्चे, प्रा. बालाजी अजगुंडे, प्रा. प्रतिभा ठावरे, प्रा. प्रियंका तेलंग, प्रा. नेहा मुंढे, प्रा. दीक्षा विभुते, प्रा. स्वस्तिका चामे, प्रा. प्रशांत बनसोडे, प्रा. रोहित कोंबडे, शिवहार विभुते, सिद्धेश्वर स्वामी, प्रमोद स्वामी, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




# कुमठा व देवंग्रा गाव वीजबील भरत झाले थकबाकी मुक्त

## वरिष्ठ तंत्रज्ञ रफिक शेख व वसंत टोम्पे यांच्या प्रयत्नांना यश

**लातूर/प्रतिनिधी :** मार्च अखेरची मागणी व थकबाकी वसुलीसाठी निलंगा विभागांतर्गत येणाऱ्या किल्लारी उपविभाग कार्यालयाने पथदर्शक पाऊल उचलत कुमठा व देवंग्रा गावाची देय तारखेच्या आत चालू महिन्याचे वीजबील व थकबाकी शंभर टक्के वसूल करण्यात यश मिळवले आहे. या यशाचे मानकरी वरिष्ठ तंत्रज्ञ रफिक शेख व वसंत टोम्पे यांचा सत्कार अधीक्षक अभियंता प्रशांत दाणी यांनी केला असून प्रत्येक जनमित्रांनी असा आदर्श समोर ठेवून मार्च अखेर संपूर्ण विभाग थकबाकीमुक्त करावा असे अवाहन केले.



मार्च अखेर चालू देयक व थकबाकी वसुलीसाठी महावितरणने कंबर कसली असून विविध उपाययोजना करून सांघिक कार्यालयाने वसुलीचे उदिष्ट पुर्णत्वास नेण्यासाठी उन्हाची पर्वा न करता दिवसभर वरिष्ठ अधिकाऱ्यांसह जनमित्र काम करत आहेत.या वसुली अभियानामध्ये मात्र किल्लारी उपविभागाने एक नवा आदर्श निर्माण केला आहे. या कार्यालया अंतर्गत येणाऱ्या मौजे कुमठा येथील २१० ग्राहकांकडील १ लाख ८० हजार आणि देवंग्रा येथील ११८ वीजग्राहकांकडील चालू देयकासह थकीत असलेल्या १ लाख ५० हजार रूपयांची शंभर टक्के वसुली करण्यात यश प्राप्त केले आहे. विशेष म्हणजे १८ मार्च देय तारिख असतानाही १ मार्चलाच उदिष्टपुर्ती करण्यात आली आहे. या यशाबद्दल मुख्य अभियंता अरविंद बुलबुले, अधीक्षक अभियंता प्रशांत दाणी, निलंगा विभागाचे कार्यकारी अभियंता नागेश देशमूख यांनी कौतूक केले आहे. सोबतच सहाय्यक अभियंता राम दिक्षीत, कनिष्ठ अभियंता व्यंकटेश जोशी तसेच किल्लारी उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता अशोक खामगळ यांचेही अभिनंदन कैले.

या प्रसंगी वरिष्ठ तंत्रज्ञ रफिक शेख यांनी वीजग्राहकांना वेळोवेळी दिलेली वीजसेवा व वेळेच्या आत केलेले तक्रारींचे निरसन यामुळेच थकबाकी वसुली शक्य झाल्याचा मनोदय व्यक्त केला. वीजग्राहकांशी सुसंवाद ठेवला तर काहीही अशक्य नाही असे वसंत टोम्पे यांनी सांगीतले.

### तीन हजार रुपयांची लाच घेताना मुख्याध्यापक अडकला जाळ्यात; गुन्हा दाखल

**लातूर/प्रतिनिधी :** : शाळेत बसवलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या खर्चाच्या नावाखाली, प्रशासकीय कामाच्या मदतीसाठी तीन हजार रुपयांची लाच स्वीकारताना बिटरगाव येथील शिवाजी विद्यालयाच्या मुख्याध्यापकाला एसीबीने बुधवारी रंगेहात पकडले. सूर्यकांत गुंडेराव चव्हाण असे अटक केलेल्या मुख्याध्यापकाचे नाव आहे. याबाबत रेणापूर पोलिसात गुन्हा नोंद आहे.

'एसीबी'कडे तक्रार केलेला तक्रारदार हा त्याच शाळेत सहशिक्षक म्हणून कार्यरत आहे. मुख्याध्यापक चव्हाण याने शाळेत बसवलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या खर्चापोटी तक्रारदाराकडे ५ हजारांची मागणी केली होती. या रकमेसाठी ते तक्रारदाराच्या दैनंदिन प्रशासकीय कामामध्ये अडवणूक करत होते. तक्रारदाराने यापूर्वीच २ हजार दिले होते, तरीही उर्वरित तीन हजारांसाठी मुख्याध्यापकाचा तगादा सुरूच होता. अखेर कंटाळून सहशिक्षकाने लातूर येथील एसीबीकडे धाव घेत तक्रार दाखल केली. तक्रारीची शहानिशा केल्यानंतर बुधवारी सकाळी ९:३३ वाजता कार्यालयात सापळा रचला. लाच स्वीकारताना सूर्यकांत चव्हाण यांना पथकाने ताब्यात घेतले. याप्रकरणी रेणापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्राचे पोलिस अधीक्षक संदीप पालवे, अपर पोलिस अधीक्षक अशोक कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपाधीक्षक संतोष बर्गे, पोलिस निरीक्षक विशाल बहात्तरे, फारूक दामटे, शाम गिरी, भिमराव आलुरे, मंगेश कोंडरे, गजानन जाधव, दिपक कलवले, किरण गंभीर, शिवराज गायकवाड, असलम सय्यद, शाहाजान पठाण, परविन तांबोळी यांच्या पथकाने केली.

टोनर रिफिलिंग

फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
प्रिंटिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

### नकली ..

चालले असता भले
उगाचंकरता उंगली
स्पोटके खूप भरली
लगेचं भडके दंगली

एक व्हिडिओ टाके
अब्रु वेशीवर टांगली
बातमी असून सरळ
अफूबगैरच झिंगली

भक्ष्य स्थानी पडली
वस्तीअसून चांगली
ब्रेकिंग न्यूज करिता
मात्र मिडीया गुंगली

भोळीभाबडी जन्ता
राजकारणी फसली
आपलेहक्क सोडून
विश्वास ठेवू बसली

जातीची समीकरणे
निष्कारण रे घुसली
कसे हो शुध्दीकरण
गर्दीअधिक नासली

हळू हळू मूठ उघडे
आज पर्यंत झाकली
खोटे झाले असेमोठे
सत्य कमान वाकली

सत्य विचारले त्यांना
जीभ ज्यांनी विकली
किती सहज न् सोपे
असली झाले नकली

– **हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६

# दयानंद विज्ञानमध्ये भौतिकशास्त्र विभागात सोलार सिस्टीम व पीसीबी डिझायनिंग प्रमाणपत्र अभ्यासक्रम ; सनरेज ग्रीन एनर्जी येथे विद्यार्थ्यांची शैक्षणिक भेट



**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर येथील भौतिकशास्त्र विभागामार्फत न्यू ट्रेन्डस इन सोलार सिस्टीम न्ड पीसीबी डिझायनिंग या विषयावर प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. हा अभ्यासक्रम दि.२३ फेब्रुवारी ते २० मार्च २०२६ या कालावधीत महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागात आयोजित करण्यात आला.या उपक्रमाला दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी व महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले.

या अभ्यासक्रमासाठी सनरेज ग्रीन एनर्जी प्रा.लि., लातूर येथील संचालक प्रदीप डी.जाधव व नितीन सूर्यवंशी यांनी मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांना सौरऊर्जा प्रणाली व आधुनिक तंत्रज्ञानाबाबत सैद्धांतिक तसेच प्रात्यक्षिक मार्गदर्शन केले.अभ्यासक्रमाचा भाग म्हणून विद्यार्थ्यांची सनरेज ग्रीन एनर्जी प्रा. लि.,लातूर येथे एकदिवसीय शैक्षणिक औद्योगिक भेट आयोजित करण्यात आली.या भेटीदरम्यान दोन्ही तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना सोलार सेलचे प्रत्यक्ष डिझाईन व सोलार सिस्टीमचे कार्य याबाबत प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. तसेच पीसीबी डिझायनिंग विषयावर डॉ.वैभव बच्चूवार यांनी विशेष मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना पीसीबी डिझाइनची प्रक्रिया व उपयोग समजावून सांगितले.

या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. जे.ए.अंगुलवार व डॉ.व्ही.ए.चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाचे आयोजन डॉ.टी.एच.मुजावर, यू.जी. ड–ऑन कोर्स समन्वयक डॉ. एस. डी. लोखंडे तसेच पी.जी. ॲन्ड–ऑन कोर्स समन्वयक डॉ. एल. एच. काथवटे यांनी केले.तसेच डॉ.व्ही.डी.मोटे,डॉ.एम.बी. पंडगे,डॉ.एस.डी.बिराजदार,डॉ.एम. डब्ल्यू.अत्राम,डॉ.एम.बी.आवळे व डॉ. व्ही.एस.चांडक यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सक्रिय सहकार्य केले.भौतिकशास्त्र विभागाचे प्रयोगशाळा सहाय्यक सुदर्शन सर्जे तसेच इतर सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनीही कार्यक्रमासाठी सहकार्य केले. या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.या अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांना नवीकरणीय ऊर्जा व इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष ज्ञान मिळाले.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्युत कामे**
वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD) मध्य रेल्व सोलापूर आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने रेल्वेच्या ई–प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई–निविदा मागवल्या आहेत: **निविदा क्रमांक:** SUR/TD/T/2025/23R1. **कामाचे नाव:** सोलापूर विभागातील दौंड–सोलापूर विभागातील मलठण स्टेशनवर प्रत्येक दिशेने एक लांब पल्ल्याच्या लूप लाईनच्या तरतुदीशी संबंधित कामाचा विद्युत TRD भाग, (पुनर्निमंत्रण). **अंदाजे किंमत:** १,२२,४०,७०३.६२. **बोली सुरक्षा:** २,११,२००/–, **पूर्णता कालावधी:** १२ महिने. **ऑफरची वैधता:** ६० दिवस. **वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ:** ०७.०४.२०२६ रोजी १५.०० वाजता. EXP-10
तिकिटांसाठी RailOne ॲप डाउनलोड करा

निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क
Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी–५२/२४–२६